मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १५६ ■ शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514







# मुंबई शहर जिल्ह्यासाठी ८१३ कोटी रुपयांचा प्रारूप आराखडा – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## यंत्रणांनी समन्वयातून दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण कामे करावीत

**मुंबई :** जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ साठी वाढीव मागणीसह ८१३ कोटी ३५ लाख ७२ हजार रकमेच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ७८५.३५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना २८ कोटी आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांसाठी ७२ हजार इतक्या रकमेचा समावेश आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून होणारी विकास कामे विहित कालमर्यादेत, गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करावीत. यासाठी कार्यान्वयीन यंत्रणांनी, टीम वर्कने मंजूर निधी विहित कालावधीत १०० टक्के खर्च करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. तसेच ज्या यंत्रणा त्यांचा मंजूर निधी व कामे विहित कालावधीत पूर्ण करणार नाहीत अशा यंत्रणेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

मुंबई शहर जिल्हा नियोजन समितीची बैठक उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वर्ल्ड ट्रेड सेंटर येथील सेंट्रम हॉलमध्ये झाली. बैठकीस कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार सर्वश्री सचिन अहिर, सुनील शिंदे, प्रसाद लाड, मनिषा कायंदे, चित्रा वाघ, अजय चौधरी, अमीन पटेल, महेश सावंत, मनोज जामसुतकर, शिवाजीराव गर्जे, जगन्नाथ अभ्यंकर, ज्योती गायकवाड, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, जिल्हाधिकारी आंचल गोयल, जिल्हा नियोजन अधिकारी विजय भोपळे, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संदीप बकरे यांच्यासह जिल्हा नियोजन समितीचे सन्माननीय सदस्य व जिल्हास्तरीय यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

२०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेमध्ये सर्वसाधारण योजनेसाठी ४०६.४२ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना २१.०४ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तर कार्यान्वयीन यंत्रणांना सर्वसाधारण योजनेसाठी २७४.१४ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १२.६ कोटीचा निधी वितरित करण्यात आला आहे. या निधीमधून सर्वसाधारण योजनेमधून १२५.९२ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ५.२४ कोटी असा १३१.१६ कोटीचा निधी खर्च झाला असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. मुंबई शहर जिल्ह्यास २०२५-२०२६ मधील मंजूर निधी १०० टक्के खर्च होण्यासाठी आवश्यकतेनुसार पुनर्विनियोजन करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली.



# दै. संध्या चा ७०वा वर्धापन दिन ठरला सुवर्णसोहळा!

## ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांना 'आदर्श पत्रकार' पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादक** : पुणे जिल्ह्यातील अग्रगण्य दैनिक 'दै. संध्या' च्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळ्यात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांना 'आदर्श पत्रकार' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

हा मानाचा पुरस्कार दै. संध्याच्या संपादिका सौ. ज्योती नाळे आणि पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक दादासाहेब कोंद्रे यांच्या शुभहस्ते नीतू मांडके सभागृह, पुणे येथे मोठ्या उत्साहात प्रदान करण्यात आला.



पत्रकारितेच्या माध्यमातून समाजप्रबोधन, शिक्षणप्रसार आणि सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करत पानसरे यांनी गेल्या अनेक वर्षांत केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या लेखणीतून अन्यायाविरोधात आवाज उठवला गेला, वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा दिला गेला आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यात मोठे योगदान दिले आहे.

दै. संध्याच्या ७० वर्षांच्या गौरवशाली वाटचालीला हा सोहळा शोभा आणणारा ठरला. उपस्थित मान्यवर, पत्रकार बांधव, वाचक आणि नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात पानसरे यांचा गौरव केला. हा पुरस्कार म्हणजे खऱ्या अर्थाने समाजासाठी झटणाऱ्या पत्रकारितेचा गौरव आहे!

**७० वर्षांची परंपरा, समाजासाठी लेखणीची धार!**

दै. संध्या च्या वर्धापन दिनानिमित्त नासिकेत पानसरे यांना मिळालेला 'आदर्श पत्रकार' पुरस्कार म्हणजे निर्भीड, प्रामाणिक आणि समाजाभिमुख पत्रकारितेचा सन्मान आहे.

# नगरसेविका रुचिता लोंढे यांचा महत्त्वपूर्ण निर्णय; पाच वर्षांचे संपूर्ण मानधन 'महापौर सहाय्यता निधी'ला देणार

**दैनिक युवक आधार**
**प्रसाद हनुमंते (पनवेल) :** पनवेल महानगरपालिकेच्या महापौरपदाची सूत्रे नितीन जयराम पाटील (नितीन भाई) यांनी स्वीकारून शहराच्या विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. या ऐतिहासिक क्षणी नगरसेविका रुचिता मुग्धा गुरुनाथ लोंढे यांनी जनसेवेप्रती आपली बांधिलकी अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे.

"जनसेवा सर्वतोपरी" या भावनेतून प्रेरित होत पुढील पाच वर्षांत नगरसेविका म्हणून मिळणारे आपले संपूर्ण मानधन व भत्ता 'महापौर सहाय्यता निधी'मध्ये वर्ग करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे पनवेलमधील गरजू नागरिकांना वैद्यकीय उपचार, शिक्षण तसेच नवउद्योजकांना (स्टार्टअप) त्यांच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी मदत होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी त्यांनी सांगितले की, मा. आमदार प्रशांतदादा ठाकूर, माजी सभागृहनेते परेशदादा ठाकूर यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनासह जिल्हाध्यक्ष अविनाशजी कोळी यांच्या आशीर्वादामुळे




पनवेलमध्ये जनसेवेची मजबूत परंपरा अधिक सक्षम होत आहे. या परंपरेचा एक भाग होण्याचा अभिमान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

"जनतेची सेवा हीच माझी खरी ओळख आणि कर्तव्य आहे. ही जबाबदारी माझ्यासाठी केवळ पद नसून सेवेचे माध्यम आहे," असे सांगत पनवेलच्या प्रत्येक नागरिकाच्या विश्वासाला पात्र ठरत जनसेवेसाठी सदैव कटिबद्ध राहणार असल्याची ग्वाही नगरसेविका रुचिता लोंढे यांनी दिली.

# उरण पं.समितीच्या सभापतीपदी उबाठाचे दीपक भोईर यांची वर्णी लावण्याची शिवसैनिकांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण पंचायत समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत 8पैकी 7 जागांवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी विजय मिळवत निर्विवाद सत्ता स्थापन केली आहे. या पार्श्वभूमीवर पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भेंडखळ गणातून निवडून आलेले दीपक भोईर यांची निवड करण्यात यावी, अशी मागणी उरण तालुक्यातील शिवसैनिकांकडून जोर धरू लागली आहे.

या निवडणुकीत नवघर गणातून परेश पाटील (उबाठा), भेंडखळ गणातून दीपक भोईर (उबाठा), जासई गणातून निर्मला घरत (शेकाप), चिरले गणातून प्रियांका मढवी (शेकाप), चिरनेर गणातून कविता पाटील



(उबाठा), आवरे गणातून प्रारंभी गावंड (शेकाप) आणि केगाव गणातून महेश म्हात्रे (शेकाप) असे महाविकास आघाडीचे सात उमेदवार निवडून आले आहेत. चाणजे पंचायत गणातून भाजपचे कैलास भोईर हे एकमेव सदस्य निवडून आले आहेत.

8पंचायत गणांपैकी 7गणांमध्ये महाविकास आघाडीचा विजय झाल्याने उरण पंचायत समितीवर महाविकास आघाडीचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. त्यामुळे आता सभापतीपदी कोणाची निवड होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

याआधीच्या काळात पंचायत समितीमध्ये शेकाप, शिवसेना आणि भाजप यांचे स्वतंत्र संख्याबळ होते. त्यावेळी झालेल्या युतीनंतर चिठ्ठीद्वारे सभापती व उपसभापती पदाची निवड करण्यात आली होती आणि दोन्ही पदे शेकापकडे गेली होती. त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत शेकापचा उमेदवार निवडून आल्याने त्यांची सत्ता अधिक मजबूत झाली होती.

मात्र सध्याच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या एकजुटीमुळे यश मिळाल्याने सभापतीपदाचा मान आघाडीतील शिवसेना (उबाठा) पक्षाला मिळावा आणि तो दीपक भोईर यांनाच द्यावा, अशी ठाम भूमिका शिवसैनिकांनी मांडली आहे.

# कवी नारायण सुर्वे साहित्य गौरव ग्रंथाचे प्रकाशन होणार




**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी :** मराठी साहित्य क्षेत्रातील सूर्य नारायण म्हणून ओळखले जाणारे कवी पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त १७ फेब्रुवारी रोजी गिरीश कंटे संपादित साहित्य गौरव ग्रंथाचे प्रकाशन नेरळ येथे होणार आहे.

पिपल्स पब्लिकेशन मुंबई आणि स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ह्या ग्रंथाचे प्रकाशन कवी ,गीतकार अरुण म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली जेष्ठ नागरिक सभागृह नेरळ येथे होत आहे.ह्या प्रकाशन सोहळ्यासाठी कवी प्रा.प्रशांत मोरे,कवी तुकाराम धांडे यांची खास उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमाला जीवनदीप शैक्षणिक संस्था चे अध्यक्ष प्रा.रविंद्र घोडविंदे,विद्यासेवक सहकारी पतसंस्था चे अध्यक्ष प्रा.सुधीर घागस, कर्जतचे इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे,माथेरान नगर परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत चौधरी,नेरळ चे माजी सरपंच सावळाराम जाधव. कवी डॉ.विलास वेखंडे उपस्थित राहणार आहेत.ह्या कार्यक्रमाला साहित्यिक मंडळींनी उपस्थित रहावे असे आवाहन पीपल्स पब्लिकेशन चे प्रा. हरेंद्र सोस्टे आणि स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठान चे अध्यक्ष कल्पेश भोईर यांनी केले आहे

# सिल्लोडमध्ये शिवजन्मोत्सवाचा हुंकार; अर्जुन पा. गाढे यांच्याकडे शिवजयंतीची धुरा

## आमदार अब्दुल सत्तार यांच्या उपस्थितीत उत्सव समिती गठीत

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :**येथील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचा उत्साह यंदा शिगेला पोहोचणार असून, या ऐतिहासिक सोहळ्याच्या नियोजनासाठी शहर व तालुका शिवजयंती उत्सव समितीची घोषणा करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी अर्जुन पा. गाढे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून, कार्याध्यक्षपदाची जबाबदारी अब्दुल आमेर यांच्यावर सोपवण्यात आली आहे. माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सेना भवन' येथे पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय करण्यात आला.

समितीच्या स्वागताध्यक्षपदी राजू बाबा काळे, महासचिवपदी देविदास पालोदकर,



सचिवपदी विशाल जाधव, कोषाध्यक्ष नंदकिशोर सहारे तर सहस्वागताध्यक्ष म्हणून सुदर्शन अग्रवाल यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

कार्यकारिणी:- उपाध्यक्ष:- सुखदेव जाधव, विठ्ठल सपकाळ, अंबादास सपकाळ, मनोज झंवर, शंकरराव खांडवे, संदीप राऊत, जयराम चिंचपुरे, मधुकर गवळी, स्वप्नील शेळके, अजित पवार, सिद्धेश्वर आहेर, मधुकर बेंडाळे, प्रशांत क्षीरसागर.

संघटक:- अरविंद शिंदे, बापू पाटील, राजेंद्र ठोंबरे, अंकुश पाटील, संजय डमाळे, जितू आरके, शिवा टोम्पे, संतोष धाडगे, नानासाहेब गायकवाड.

रणरागिणींचा सहभाग:- दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, मेघा शाह, मंगलाताई तायडे, आशाताई गाढे, निकिता काळे, जयाताई ताठे यांच्यासह अनुभवी महिला पदाधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

या सोहळ्याला आमदार अब्दुल सत्तार, नगराध्यक्ष अब्दुल समीर, देविदास पा. लोखंडे, केशवराव पा. तायडे यांच्यासह ज्येष्ठ मार्गदर्शकांचे सहकार्य लाभणार आहे.

# छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक राजू वैद्य यांचा पाटोदा पत्रकार संघाकडून सत्कार

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-** पाटोद्याचे भूमिपुत्र तथा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाकडून विजयी झालेले नवनिर्वाचित नगरसेवक रेणुकादास उर्फ राजू वैद्य यांचा पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने गुरुवारी दिनांक १२ फेब्रुवारी रोजी भव्य सत्कार करण्यात आला. राजू वैद्य हे रेणुका माता देवी (माळावरील) दर्शनासाठी पाटोदा येथे आले असता पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत केले. राजू वैद्य हे पाटोद्याचे सुपुत्र असून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत सलग चौथ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. या पूर्वी त्यांनी महानगर पालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदाची तसेच गटनेतेपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून यंदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून




उमेदवारी मिळाल्यानंतर मतदारांनी त्यांना भरघोस मतांनी विजयी केले आहे. या वेळी पाटोदा तालुका पत्रकार संघाचे संस्थापक/ अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, सचिव अँड. महेश बेदरे, जेष्ठ पत्रकार अजिज शेख, विजय जाधव, पत्रकार सतीश गर्जे, रियाज सय्यद, महेशर शेख, दत्ता वाघमारे, सूर्यकांत पवळ, संपादक सचिन गायकवाड, प्रेस छायाचित्रकार सखाराम भोसले, प्रेस छायाचित्रकार राहुल सोनवणे, युवा उद्योजक विशाल अडसूळ पाटील, सुनील आबा नाईकनवरे, प्रशांत देशमुख यांच्या सह पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार प्रसंगी उपस्थितांनी वैद्य यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत पाटोद्याचे नाव महानगर पातळीवर उज्ज्वल करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# येवता ता रिसोड येथे वानराचा नागरिकावर जीवघेणा हल्ला, बंदोबस्तसाठी ग्रामस्थांची निवेदन द्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. प्रतिनिधी/ रणजित. ठाकूर :** रिसोड तालुक्यातील येवता येथे माकडानी गावामध्ये हैदोस घालत गावातील एका महिलेवर जीवघेणा हल्ला केला.त्या हल्ल्यामध्ये त्या गंभीर जख्मी झाल्यात.त्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु माकडानी त्यांना जोरदार धडक दिली आणि त्यामध्ये त्यांचा पाय मोडला असून गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये उपचार घेतल्यावर आता वाशिम येथे खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत.या घटनेमुळे गावामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून सर्व नागरिक चिंतेत आहेत.आता दोन दिवसापूर्वी एका नागरिकांवार सुद्धा असाच हल्ला केला होता. या माकडानी गावातील



घरावरचे पत्रे अन्नधान्य चे खूप मोठे नुकसान केले आहे. गावातच जि प प्राथमिक शाळा असून शाळेमध्ये लहान मुलं आहेत.त्या मुलावर सुद्धा माकडानी हल्ला करण्याचा प्रयत्न केला परंतु शाळेतील शिक्षक असल्यामुळे बचाव झाला. एकूणच या माकड्यांच्या टोळीने गावामध्ये दहशत निर्माण झाली असून त्याचा लवकरात लवकरच बंदोबस्त करावा असा प्रकारचे निवेदन वनविभाग वाशिम येथील श्री चव्हाण साहेब यांना रिसोड तालुका उपाध्यक्ष, भावनाताई यांचे कट्टर समर्थक व सामाजिक कार्यकर्ते श्री गजानन देशमुख, उपसरपंच श्री हरिभाऊ भांदुर्गे, नारायण भांदुर्गे यांनी केली आहे.

# महारेशीम अभियानात तुती लागवडीसाठी नोंदणी सुरू

## अधिकाधिक शेतक-यांनी लाभ घ्यावा जिल्हा रेशीम विकास अधिकारी सुनीलदत्त फडके

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यात महारेशीम अभियानाला सुरूवात झाली असून, दि. ५ मार्चपर्यंत नवीन तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. यासाठी आपले सरकार या पोर्टलवर वस्त्रोद्योग विभाग निवडून ऑनलाईन नोंदणीचा अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शेतक-यांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा रेशीम विकास अधिकारी सुनीलदत्त फडके यांनी केले आहे.

राज्यात तुती लागवड करून शेतकरी रेशीम कोष निर्मितीपासून भरघोस उत्पन्न मिळवत आहेत. रेशीम उद्योगासाठी राज्यात अनुकूल वातावरण असल्याने या उद्योगात दरवर्षी वाढ होत आहे. तुती लागवडीद्वारे रेशीम कोष उत्पादन करून एक एकर क्षेत्रात दुसऱ्या




वर्षी पासून दोन लक्षपेक्षा जास्त उत्पन्न महाराष्ट्रातील शेतकरी मिळवत आहेत. मोठ्या प्रमाणात रेशीम कोष उत्पादन होत असल्याने त्यासाठी महाराष्ट्रातील जालना, बीड, बडनेरा, सोलापूर, बारामती नागपूर या जिल्ह्यात कोश बाजारपेठ सुरू करण्यात आल्या आहेत. रेशीम उद्योगाला दिवसेंदिवस प्रचंड प्रतिसाद मिळत असून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे शासनाचे धोरण याद्वारे साध्य होत आहे.

रेशीम उद्योगाच्या वाढीसाठी महाराष्ट्र शासनामार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (जी -राम -जी) या अंतर्गत अल्प भुधारक शेतकऱ्यांसाठी १ एकर तुती लागवड जोपासना आणि किटक संगोपन गृह साठी ८९५ मनुष्य दिवस तीन वर्षांमध्ये मजुरी रु. २ लक्ष ७९ हजार २४० व साहित्यासाठी रु. १ लक्ष ५३ हजार रुपये असे एकूण चार लक्ष 32 हजार २४० अनुदान दिले जाते. तसेच केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र या योजने अंतर्गत तुती लागवडीसाठी प्रति एकरी रु. ४५ हजार, सिंचन संचासाठी प्रति एकरी रुपये ४५ हजार, कीटक संगोपन गृहासाठी रु २ लक्ष ४३ हजार ७५०, संगोपन साहित्यासाठी रु.३७ हजार ५०० व निर्जंतुकीकरण औषधि साठी रु. ३ हजार ७५० असे एकूण रु. ३ लक्ष ७५ हजार अनुदान दिले जाते. बहू- भूधारक शेतकऱ्यासाठी तुती लागवड २.०० एकर सुध्दा सिल्क समग्र -२ या योजनेतून करता येते त्यासाठी तुती लागवड,किटक संगोपन गृह, संगोपन साहित्य व निर्जंतूकीकरण औषधि करीता रु.५ लक्ष ६२ हजार ५०० अनूदानदिले जाते.

कृषी विभागाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजने अंतर्गत (पोकरा) तुती लागवड करिता रु.४५ हजार रेशीम कीटक संगोपन गृहसाठी २ लक्ष ४३ हजार ७५० व संगोपन साहित्य यासाठी रु. ३६ हजार ३७५ असे एकूण रु. ३ लक्ष २५ हजार १२५ अनुदान दिले जाते. अकोला जिल्ह्यातील १४९ गावांमध्ये पोकरा ही योजना लागू करण्यात आली आहे. या करिता शेतकरी बंधूनी कृषी विभागाकडे ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे. तसेच मनरेगा व सिल्क समग्र योजनेसाठी नोंदणी जिल्हा रेशीम कार्यालय, प्लॉट क्र. ८,९,१० एम.आय.डी.सी फेज- I, शक्ती टायर्स जवळ, अकोला येथे संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा रेशीम अधिकारी, अकोला यांच्याकडून करण्यात येत आहे

# दिग्रस नगरपरिषदेसमोर तरुणाचा आत्मदहनाचा प्रयत्न

## मुख्याधिकारी साहेब, कर्मचारी गैरहजर, पोलिस प्रशासन देवदुत म्हणून हजर

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर :** दिग्रस शहरातील बजरंग नगर परिसरातील नाली बांधकामाची वारंवार मागणी करूनही नगरपालिका प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे श्री गजानन बाबाराव गंडाळे या त्रस्त नागरिकाने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष बाब म्हणजे नगरपालिका मुख्याधिकारी साहेब यांना या आंदोलनाची कल्पना असताना मुख्याधिकारी साहेब घटनास्थळी उपस्थित नव्हते व संबंधित अधिकारी सुद्धा नव्हते तेव्हा घटनास्थळी पोलीस प्रशासनाचे कर्मचारी देवदूत म्हणून आले आणि वेळेत हस्तक्षेप करून




पोलीस प्रशासनामुळे नागरिकाचा आत्मदहनाचा प्रयत्न फसला

त्यामुळे मोठा अनर्थ टळला व त्यांनी आंदोलन करणाऱ्या नागरिकाला आत्मदहनापासून वाचविले व गजानन गंडाळे यांनी अनेक वेळा तक्रारी, निवेदने व पाठपुरावा करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने नागरिकाचा संताप अनावर झाला.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरात नाली नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर साचत असून दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र याकडे नगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून संतप्त नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे. आत्मदहनाचा शहरातील नागरिक नगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यावर तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

# जिल्हास्तरीय तपासणी समितीच्या पुनर्गठनासाठी अशासकीय सदस्यांचे नामांकन सुरू

## जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम,बालहक्क, संरक्षण व संगोपन क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनुभवी व्यक्तींकरिता एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे. महिला व बाल विकास विभाग, वाशिम अंतर्गत जिल्हास्तरीय तपासणी समितीचे पुनर्गठन करण्यात येत असून त्यासाठी नागरी समूहातील एका अशासकीय सदस्याचे नामांकन मागविण्यात येत आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि दि. २१ मार्च २०१८ च्या शासन निर्णयानुसार, विधी संघर्षग्रस्त तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना निवासी सेवा देणाऱ्या शासकीय व स्वयंसेवी संस्थांची वेळोवेळी तपासणी करणे बंधनकारक आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे.

या समितीसाठी नामांकित होणारी व्यक्ती किमान पदवीधर असावी, तसेच बालहक्क, संरक्षण व कल्याण क्षेत्रात किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. उमेदवाराचे वय ३५ ते ६५ वर्षांच्या दरम्यान असावे. नियुक्तीचा कालावधी ३ वर्षांचा राहणार आहे.जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनुभवी व्यक्तींनी आपले अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, वाशिम येथे ८ दिवसांच्या आत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी केले आहे.

## अल्पसंख्यांक युवकांसाठी नोकरीचा महामेळावा!

# १८ फेब्रुवारीला कारंजा लाड येथे थेट भरती सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम,जिल्ह्यातील अल्पसंख्यांक युवक-युवतींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांच्या सहकार्याने व दगडूजींग नाईक शिक्षण प्रसारक संस्था, लोणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना थेट नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून देण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला असून, रोजगाराच्या शोधात असलेल्या उमेदवारांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे. हा रोजगार मेळावा मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शेतकरी भवन, कारंजा लाड (जि. वाशिम) येथे सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत पार पडणार आहे.

मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून थेट मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करणार आहेत. यामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ई., बी.टेक, एम.टेक, एमबीए, डी.फार्म, एमसीए, बीसीए, पॉलिटेक्निक उत्तीर्ण तसेच इतर पदवीधारक उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. नव्याने पदवी प्राप्त केलेले उमेदवारही या मेळाव्यात सहभागी होऊ शकतात.मेळाव्यास येताना उमेदवारांनी अद्ययावत बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो, आधार कार्ड तसेच शैक्षणिक कागदपत्रांच्या मूळ व छायांकित प्रती सोबत आणाव्यात. तसेच उमेदवारांनी कॉर्पोरेट ड्रेस कोडनुसार औपचारिक शर्ट-पॅन्टमध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या विशेष रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पात्र अल्पसंख्यांक उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे यांनी केले आहे.

# कायदेविषयक जागरूकता वाढविण्यासाठी तसेच त्यांचे हक्क व अधिकार याबाबत सविस्तर मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** कामोठे येथे नागरिकांमध्ये पोलिस प्रशासन तसेच कायदेविषयक जागरूकता वाढविण्यासाठी तसेच त्यांचे हक्क व अधिकार याबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे पोलीस स्टेशन आणि दिशा महिला मंच वकील संघटना पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून सन्माननीय विमल बिडवे मॅडम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कामोठे पोलीस स्टेशन, सन्माननीय मनोहर पगार सर पोलीस निरीक्षक (क्राईम), कामोठे तसेच ॲड. रत्नदीप पाटील, अध्यक्ष, पनवेल वकील संघटनना यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले.

पोलिस आणि नागरिक यांच्यात विश्वास, पारदर्शकता आणि सहकार्याचे भक्कम नाते निर्माण झाले तरच समाज खऱ्या अर्थाने सुरक्षित राहू शकतो.



भीती नव्हे तर विश्वास हीच पोलीस व्यवस्थेची ताकद आहे. महिलांनी, ज्येष्ठ नागरिकांनी आणि पालकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून कायद्याचा योग्य वापर करणे अत्यावश्यक आहे. वेळोवेळी जनता व पोलीस यांच्यात सकारात्मक संवाद घडावा आणि जनतेत कायद्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी कामोठे पोलीस स्टेशन सातत्याने जनजागृती उपक्रम राबवत आहे आणि भविष्यातही कटिबद्ध राहील असे मत सन्मानिय विमल बिडवे मॅडम यांनी व्यक्त केले.

न्याय हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्थिती किंवा अज्ञानामुळे कोणीही न्यायापासून वंचित राहू नये, हीच विधी सेवा समितीची भूमिका आहे. गरजू नागरिकांना मोफत कायदेशीर मदत, सल्ला आणि मार्गदर्शन देण्यासाठी शासनाने विविध योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरिकांनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवून कायद्याचा योग्य वापर करावा आणि कोणतीही अडचण असल्यास निर्धास्तपणे विधी सेवा समितीकडे संपर्क साधावा असे मत रत्नदीप पाटील यांनी व्यक्त केले.समाज सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. पालकांनी आपल्या मुलांशी संवाद वाढवून त्यांना योग्य संस्कार व मार्गदर्शन दिले, तर अनेक गुन्हे टाळता येऊ शकतात. ज्येष्ठ नागरिकांनीही सतर्क राहून कोणतीही संशयास्पद बाब तात्काळ पोलिसांना कळवावी. कामोठे पोलीस स्टेशन नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे. भीती न बाळगता विश्वासाने पोलिसांशी संपर्क साधन्याचे आवाहन पोलीस निरीक्षक क्राइम मनोहर पगार यांनी केले .

कार्यक्रमादरम्यान तालुका विधी सेवा समितीच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास वकील संघटनेचे सदस्य प्रज्ञा भगत, सुयश कामेरकर, संतोषी चव्हाण उपस्थित होते तसेच कामोठे परिसरातील समाजसेविका व मान्यवरांमध्ये रंजना सडोलीकर, जयदादा डिगोले, वैशालीताई जगदाळे, सरिताताई पाटील, मोहिनी पुजारी, उमेश नंदोला,जयवंत खरात काका, संतोष जाधव सर आदींची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे निवेदन उपाध्यक्ष विद्या मोहिते व ॲड. शैलेश कोंडस्कर यांनी अत्यंत समर्पक व प्रभावी पद्धतीने सादर केले.भारती शितोळे, करिश्मा झांबरे यांची मदत व्यासपीठास मिळाली.नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला समाजात कायदेविषयक जनजागृती वाढविण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन यंदा सांगलीत – मंत्री चंद्रकांत पाटील

**मुंबई :** कला संचालनालयामार्फत आयोजित '६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग)' यंदा सांगली येथे आयोजित करण्यात येत असून, १६ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कलाविश्व महाविद्यालय, शांतिनिकेतन आवार येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांचा विशेष गौरव हे यंदाच्या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली.पालक मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, राज्यातील शासकीय व खासगी कला संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळावे या उद्देशाने हे प्रदर्शन दरवर्षी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आयोजित केले जाते. यंदा राज्यभरातून ३ हजार ४९० विद्यार्थ्यांच्या ५ हजार ६८० कलाकृती प्राप्त झाल्या असून, त्यापैकी निवड समितीने १,२७५ उत्कृष्ट कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड केली आहे. या प्रदर्शनादरम्यान ज्येष्ठ कलावंत जी. एस. माजगावकर यांच्या दीर्घकालीन कलात्मक आणि शैक्षणिक योगदानाचा गौरव करत महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदापासून एक नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यापूर्वी केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मर्यादित असलेल्या या व्यासपीठावर आता शासकीय रेखाकला परीक्षा (ग्रेड परीक्षा) व बालचित्रकला स्पर्धेतील गुणवंत शालेय विद्यार्थ्यांचाही गौरव केला जाणार आहे. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना थेट राज्याच्या मुख्य कला प्रवाहात सहभागी करून घेण्याचा हा निर्णय कला क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच महाराष्ट्राचा समृद्ध कला वारसा पुढील पिढीकडे पोहोचविण्यासाठी हे प्रदर्शन महत्वाचे ठरेल. सांगलीकर कलाप्रेमी, विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कलाविष्काराचा आनंद घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

# पनवेल तालुका अखिल भंडारी सेवा मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** रविवार दि. ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी जेष्ठ नागरीक हॉल, पनवेल येथे संपन्न झाले. संमेलनाध्यक्ष राष्ट्रपती पदक विजेते श्री. विजय हातिसकर ( APC), प्रमुख पाहुणे श्री. सुबोध तोडणकर, सत्कार मुर्ती श्री. राजीव यशवंत किर (नगरसेवक - रत्नागिरी) व मंडळाचे अध्यक्ष डॉ. दिपक खोत यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. पनवेलचे



आमदार श्री प्रशांत शेठ ठाकूर व महासंघाचे अध्यक्ष श्री नविनचंद्र बांदिवडेकर यांनी उपस्थित राहून सभेला संबोधित केले.यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी होम मिनीस्टर , जेष्ठ नागरिक सन्मान, विदयार्थाचा गुणगौरव सोहळा व प्रमुख पाहुण्याचे मार्गदर्शनपर भाषण आदी कार्यक्रम पार पडले. या सोहळ्यास ६०० सभासदांनी सहभाग घेतला. सौ. विनीता शिवलकर, सौ मेघना रुमडे व सौ अनुष्का बागकर यांनी अनुक्रमे १, २, व ३ क्रमांकाने पैठणी जिंकली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष डॉ. दिपक खोत, सेक्रेटरी रत्नराज महाडीक, खजिनदार सौ श्रुती केळसकर, उपाध्यक्ष निशांत रिळकर , विनायक शिवलकर आदी मान्यवर कमीटी सदस्य उपस्थित होते.

# पराभव झाला,तरी सौरभ झगडेच चर्चेत ; शेटफळगढे गटात अपक्षाची छाप

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय** : शेटफळगढे पंचायत समिती गटातील निवडणुकीत अपक्ष उमेदवार सौरभ झगडे यांचा पराभव झाला असला,तरी संपूर्ण इंदापूर तालुक्यात सध्या त्यांच्या नावाचीच चर्चा रंगली आहे.विजय न मिळवता देखील झगडे यांनी उभा केलेला संघर्ष,तरुणांशी जोडलेली नाळ आणि प्रचारातील वेगळा अंदाज यामुळे त्यांनी मतदारांच्या



मनावर ठसा उमटवला आहे. निवडणुकीदरम्यान सौरभ झगडे यांनी पारंपरिक राजकारणापेक्षा वेगळी भूमिका घेत थेट मतदारांशी संवाद साधण्यावर भर दिला. गावोगावी भेटी,तरुणांना सोबत घेत केलेला प्रचार आणि स्थानिक प्रश्नांवर स्पष्ट भूमिका यामुळे त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला.अनेक ठिकाणी त्यांनी निर्माण केलेली चुरस ही चर्चेचा विषय ठरली.पराभव झाला असला तरी सौरभ झगडे यांच्या कार्यपद्धतीची आणि विचारांची चर्चा तालुकाभर सुरू आहे.विशेषत: तरुण वर्गामध्ये त्यांच्याबद्दल आकर्षण दिसून येत असून भविष्यातील नेतृत्व म्हणून अनेक जण त्यांच्याकडे पाहत आहेत. निवडणुकीत त्यांनी दाखवलेली जिद्द आणि सातत्य यामुळे त्यांची तालुक्यात लोकप्रियता वाढल्याचे चित्र सध्या दिसत आहे.दरम्यान निवडणुकीनंतर दिलेल्या प्रतिक्रियेत झगडे यांनी मतदारांचे आभार मानत"ही लढत थांबणार नाही, जनतेच्या प्रश्नांसाठी काम सुरूच राहील,"असा विश्वास व्यक्त केला.पराभव हा तात्पुरता असतो,मात्र जनतेचा विश्वास आणि साथ हीच खरी ताकद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एकूणच शेटफळगढे गटातील निकाल काहीही असला तरी सौरभ झगडे यांनी आपल्या कामाच्या आणि शैलीच्या जोरावर तालुक्याच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली असून पुढील काळात त्यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नवी आबादी परिसरात मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष

## महादेव मंदिर परिसरातील पुलावरील लाईट बंद, वॉर्ड क्रमांक ३ मधील नालीवरील धाबे फुटले

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी/योगेश चौदंते** : नवी आबादी परिसरातील महादेव मंदिराजवळील पुलावर बसवलेले रस्त्यावरील लाईटचे बल्ब गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असून, त्यामुळे नागरिकांना रात्री मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अंधारामुळे परिसरात अपघाताची तसेच असामाजिक तत्वांची भीती वाढली आहे. मात्र या गंभीर समस्येकडे संबंधित नगरसेवकांकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

याच वॉर्ड क्रमांक ३ मध्ये नालीवर टाकलेले धाबे अनेक ठिकाणी फुटले असून, पावसाळ्यात किंवा रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी



धाबे पूर्णतः तुटलेले असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वार यांना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे नगरपरिषद प्रशासन व संबंधित लोकप्रतिनिधींनी तात्काळ लक्ष देऊन पुलावरील लाईट सुरू करावेत तसेच नालीवरील फुटलेले धाबे दुरुस्त करावेत, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## सिल्लोड तालुक्यात 'शिवआरोग्य' जागर! शिवजयंतीनिमित्त ५० गावांत एकाच वेळी महाआरोग्य शिबिराचा महायज्ञ

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर / सिल्लोड** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीचे औचित्य साधून सिल्लोड तालुक्यात केवळ पारंपरिक पद्धतीने उत्सव न साजरा करता, 'रयतेची सेवा हीच ईश्वराची सेवा' या भावनेतून एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात येणार आहे. सिल्लोड तालुका डॉक्टर असोसिएशनच्या वतीने 'शिव महाआरोग्य अभियान-२०२६' अंतर्गत येत्या रविवारी (दि. १५ फेब्रुवारी) तालुक्यातील तब्बल ५० गावांमध्ये एकाच वेळी मोफत रक्तदाब (बीपी) आणि शुगर (मधुमेह) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील जनतेला वाढत्या जीवनशैलीजन्य




आजारांपासून वाचवण्यासाठी डॉक्टरांनी हे अभियान हाती घेतले आहे. या उपक्रमाचे मुख्य केंद्र पालोद येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे असणार आहे. रविवारी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत हे शिबिर पार पडेल. एकाच दिवशी, एकाच वेळी ५० केंद्रांवर आरोग्य तपासणी होणारा हा तालुक्यातील पहिलाच भव्य प्रयोग ठरणार आहे.

या अभियानाचे मुख्य संयोजक डॉ. निलेश मिरकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील नामांकित डॉक्टरांचे पथक या मोहिमेत सहभागी होणार आहे. "शिवरायांच्या विचारांचा वारसा जपत, सुदृढ समाज घडवणे हेच आमचे ध्येय आहे," अशी भावना डॉ. मिरकर यांनी व्यक्त केली. वाढत्या मधुमेहाच्या आणि रक्तदाबाच्या धोक्याबद्दल जनजागृती करणे, हा या मोहिमेचा मुख्य गाभा आहे.

सिल्लोड तालुक्यातील नागरिकांनी, विशेषतः कष्टकरी शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे दुर्गम भागातील रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि मोफत तपासणीची संधी उपलब्ध होणार असल्याने, संपूर्ण जिल्ह्यातून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

## माता रमाई जयंतीनिमित्त निर्भय महाराष्ट्र पार्टीकडून अभिवादन धम्मयान दिनदर्शिका 2026 चे वाटप व संविधान–आरक्षण लढ्यासाठी आवाहन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)** : माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने सामाजिक समतेचा, संविधानिक मूल्यांचा आणि आरक्षणाच्या लढ्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमात माता रमाई यांच्या सामाजिक कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांची आठवण करून देण्यात आली.

आज दिनांक 7 फेब्रुवारी 2026 रोजी नगरसेविका सिंधुताई गांगुर्डे, त्यांचे पती अशोकराव तुकाराम गांगुर्डे व चिरंजीव सचिन गांगुर्डे यांच्या हस्ते दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाची धम्मयान दिनदर्शिका 2026 वाटप करण्यात आले. या दिनदर्शिकेमार्फत बौद्ध धम्म, सामाजिक परिवर्तन व संविधानिक मूल्यांचा प्रसार करण्याचा उद्देश व्यक्त करण्यात आला.

यावेळी आरक्षणासाठी पुढे आलेल्या अनुसूचित जातीतील (SC) सर्व जातींना



संविधान व आरक्षणाच्या लढ्यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे निवेदन करण्यात आले. संविधान हेच वंचितांचे संरक्षण असून, हक्क टिकवण्यासाठी संघटित संघर्ष आवश्यक असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास निर्भय महाराष्ट्र पार्टी पिंपळगाव बसवंत शहराध्यक्ष फारुक शेख, मीडिया प्रमुख संतोष बोरसे, तालुकाध्यक्ष संतोष यादवराव सुरडकर, शरद सोळशे, इम्रान पठाण, गोकुळ पगारे, समाजबांधव योगेश गांगुर्डे (YG), अशोकराव गांगुर्डे, गोरख गांगुर्डे, नगरसेवक सुरेश वाघले, दिलीप पुंडलिक बनकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक सलोखा, बंधुता व समानतेचा संदेश देणारे ठरले. माता रमाई यांच्या विचारांवर चालत संविधानिक मार्गाने न्याय, हक्क व स्वाभिमानासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

## श्रीलंकेतील दोन युवकांचा सायकल दौरा शिवपुरीत; तक्षशिला विहारात सत्कार शिवपुरी

**दैनिक युवक आधार**

**हदगाव प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे** : श्रीलंका येथील दोन युवकांनी धम्मप्रसार व भारत दर्शनाच्या उद्देशाने सायकलवरून सुरू केलेल्या विशेष दौऱ्याचे आज शिवपुरी नगरीत आगमन झाले. दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी श्रीलंकेतून या धम्मयात्रेला प्रारंभ करण्यात आला असून आतापर्यंत त्यांनी सुमारे ७,००० किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला आहे. या प्रवासाला १०८ दिवस पूर्ण झाले आहेत.

या युवकांनी आंध्रप्रदेश, ओडिशा, बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, नेपाळ मार्गे महाराष्ट्रात प्रवेश केला आहे. येथून पुढे त्यांचा प्रवास जम्मू-काश्मीर, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये सायकलवरूनच सुरू राहणार आहे. भारतभर धम्म, शांती आणि बंधुभावाचा संदेश देत त्यांची ही यात्रा पुढील काही दिवस सुरू राहणार आहे.

शिवपुरी येथे आगमन झाल्यानंतर तक्षशिला बौद्ध विहारात समस्त बौद्ध समाजाच्या वतीने या युवकांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या



पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे आयोजन आमोल कांबळे आणि पंडित जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन विठ्ठल कदम यांनी मानले. यावेळी उपस्थित . रामचंद्र कदम.भुजगराव कदम.वामनराव कदम. शेषेराव जाधव.किशन जाधव वाघुजी जाधव. तुकाराम कदम.दिपक हाटे.भिमराव इंगोले.विनोद कदम.राजु कदम.रोहित कांबळे.आमोल जाधव. विठ्ठल जाधव.बापुराव कदम.बाबुस कांबळे.सिध्दु लोंखंडे.संदेश जाधव.प्रशांत कदम .पुण्शिल कदम साहेबराव हणवते.संदिप कदम.तथागत जाधव यशवंत कदम रवीराज जाधव अरविंद कदम गणपत कदम धम्मपाल मस्के. शिवपुरीतील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोंगरकिन्हीचे उद्योजक अनिलशेठ काथवटे यांच्या ड्रीम घर प्रोजेक्ट कार्यालयाचा आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते शुभारंभ

### प्रोजेक्टला सर्वतोपरी मदत करण्याची जबाबदारी ही आमची. :- आमदार प्रशांत ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी)**:- एक स्वप्न नव उद्योजक अनिलशेठ काथवटे यांनी पाहीले आणि वयाच्या बावीसाव्या वर्षापासून आखणीस सुरुवात केली. अनेक संघर्षात, जिद्दीला व कष्टाला मधाळ वाणीचे कवच मिळाले. व लोकनायक आमदार सुरेश आण्णा धस यांच्या आशिर्वादाने पनवेल शहरात उद्योगात यशस्वी उडी घेऊन येथील दोन प्रमाणिक भागिदारीच्या साथीने ड्रिम घर या नविन व्यवसायास सुरुवात केली. पनवेल शहर मोठ्या झपाट्याने विकसित होत चाललेले आहे. या ठिकाणी विमानतळ वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्रगती पथावरच हे शहर असल्याने आणि अटल सेतू ने मुंबई एक तासावर जोडल्याने या भागातील बहुतांश जनता पनवेल मध्ये राहून मुंबईचा अपडाऊन प्रवास करत



असल्याने या शहराला वैभव प्राप्त झालेले आहे. अशा शहरांमध्ये अनिलशेठ काथवटे व त्यांचे सर्व सहकारी यांनी ड्रीम घर प्रोजेक्ट सुरू करून सामान्य नागरिकांना एक हक्काचे घर देण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे त्यांनी या वेळी स्पष्ट केले. या वेळी आमदार सुरेश आण्णा धस यांनी बोलताना सांगितले की अनिलशेठ व त्यांचे सर्व सहकारी हे अतिशय इमानदारीने प्रामाणिक काम करणारे कार्यकर्ते आहेत. आणि त्यांच्या हातून सामान्य नागरिकांना एक अतिशय सुंदर आणि चांगलं घर त्या ठिकाणी दिले जाणार आहे. या मध्ये कोणत्याही माणसाची एक ही टक्का फसवणूक किंवा अडवणूक होणार नाही याचा मला ठाम विश्वास आहे. आणि या विश्वासाने ड्रीम घर प्रोजेक्ट हे नावा रुपाला येईल. या भागामध्ये अजून ते मोठ्या क्षमतेने त्यांचं कार्य उभा करतील असा मला विश्वास आहे. याच बरोबर पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले की पनवेल शहरांमध्ये आम्ही सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणारे कार्यकर्ते आहोत आणि या शहरांमध्ये ड्रीम घरच्या माध्यमातून आमच्या लोकांना एक चांगली सुविधा उपलब्ध होणार आहे म्हणून आम्ही सर्वजण या ड्रीम घरच्या सोबत आहोत आणि दुधात साखर पडावी तस आमदार सुरेश आण्णा धस हे या ठिकाणी आल्याने आणि त्यांच्या शुभ हस्ते हा प्रोजेक्ट उभा राहिल्याने या प्रोजेक्टला सर्वतोपरी मदत करण्याची जबाबदारी ही आमची आहे. त्या मुळे या ठिकाणी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही आणि जरी आली तर या ठिकाणी प्रशांत ठाकूर हा सक्षम उभा असेल असे त्यांनी या वेळी बोलताना सांगितले, व या ड्रीम घर प्रोजेक्टला शुभेच्छा दिल्या. या वेळी आमदार सुरेश आण्णा धस, आमदार प्रशांत ठाकूर, शिवराज पाटील(एस पी ठाणे), सलमान शेख, आय आर एस नेहा निकम, जि.प.सदस्य अतुलशेठ घरत, बारगजे नगरसेवक, विशाल बडे आणि ड्रीम घर चे भागीदार अनिल काथवटे, काझी राफीउद्दिन नुरुल, इस्लाम जमिल शेख, राठोड सह इतर जण उपस्थित होते. शेवटी उपस्थित सर्वांचे आभार अनिलशेठ काथवटे यांनी मानले.

### मराठवाडा जनहित पार्टीच्या वतीने भव्य निरोप समारंभ व कार्य गौरव सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/पुनम एडके** : दिनांक 8 फेब्रुवारी रोजी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत ची मुदत संपली असल्याकारणाने मराठा गणित पार्टीच्या वतीने धर्माबाद तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच तालुक्यातील



सेवा सहकारी सोसायटी यांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासाठी आयोजित भव्य निरोप समारंभ व कार्यगौरव सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नगर परिषद उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय अध्यक्ष मराठवाडा जनहित पार्टी महेश ( शंकर) नारायण बोलमवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष मोईजसेठ करखेलीकर, नगराध्यक्षा सौ. संगीता महेश बोलमवार, शेषेराव पाटील फडसे , राष्ट्रीय सचिव तथागत नेता ताहेर पठाण यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. कार्यक्रमात धर्माबाद तालुक्यातील विविध गावातील लोकप्रतिनिधींचा सत्कार व त्यांच्या उल्लेखनीय कार्यांचा गौरव करण्यात येणार असून. "होय, आम्ही सक्षम आहोत आणि आपल्या गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहोत,"अशी ऊर्जा देणारा हा कार्यक्रम दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता, महेश्वरी भवन, नगरपालिका जवळ, धर्माबाद येथे पार पडणार आहे. सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याच्या आव्हान मराठवाडा जनहित पार्टीचे सचिव ताहेर पठाण यांनी केले असून कार्यक्रमाचे आयोजन मराठवाडा जनहित पार्टी , धर्माबाद यांच्या वतीने करण्यात येणार आहे.

## वन विभागाची तत्परता; महसूल प्रशासनाची निष्क्रियता?

### नाला उचलला, झाड जमीनदोस्त,रस्ता बंदच!

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : विष्णुनगर हद्दीतील गट नंबर १४६ मधील प्रकाराने प्रशासनातील विसंगती उघड केली आहे. शिवाजी कारभारी घायाळ यांनी JC-Bच्या साह्याने सरकारी नाला उचलल्याचा तसेच सुमारे ५० वर्षांचे चिंचेचे झाड परवानगीशिवाय जमीनदोस्त केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अस्तित्वात असलेला रस्ताही बंद करण्यात आल्याने शेतकरी व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या घटनेची दखल घेत वन विभागाने तात्काळ घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. अधिकारी विजय दौंडे, भारत माळी, अंकुश पुंड, शरद चांदोरे व वैभव दौंडे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून झाडतोडीची नोंद केली. त्यामुळे वन विभागाने वेगाने पावले उचलल्याचे स्पष्ट झाले आहे.मात्र महसूल प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने

> **“आम्ही सर्वांनी कायदेशीररित्या रस्ता घेतलेला आहे. तरीसुद्धा वेळकाढूपणा केला जात आहे. आम्हाला शेतात जाण्यासाठी अडचणी येत आहेत. प्रशासनाने तात्काळ रस्ता मोकळा करून द्यावा"**
>
> **प्रतिक्रिया:- कचरू घायाळ ग्रामस्थ**

प्रश्न उपस्थित होत आहेत. २०१९ साली शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर रस्ता देण्याबाबत स्वाक्षऱ्या झाल्या असतानाही प्रत्यक्षात रस्ता खुला करण्यात आलेला नाही.वन विभागाने पंचनामा करून आपली जबाबदारी पार पाडली, मात्र महसूल प्रशासनाची भूमिका अजूनही अस्पष्ट आहे. नाला व रस्त्याची स्थिती पूर्ववत केली जाणार का?दोषींवर गुन्हा दाखल होणार का?याची उत्तरे प्रशासनाने तातडीने द्यावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

## सुरगाणा महाविद्यालयात मराठी भाषेचे संवर्धन विषयावर व्याख्यान संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ सी जी दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त व्याख्यान संपन्न झाले .

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. केशव गावित यांनी मराठी भाषा संवर्धन व विकास या विषयावर सविस्तर माहिती देताना १२ व्या शतकातील मराठीचे स्थान म्हाइंभटाचे साती ग्रंथ, चक्रधर स्वामीचा दृष्टांत यांच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली .कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा सुरेश भोये यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा आहे, भाषा ही दर बारा कोशावर बदलते आणि लोकांच्या संवादात मराठी भाषेत इंग्रजी गुजराती डांगी भाषेतील शब्दांचा भरणा वाढत आहे भाषा विकसित करण्यासाठी मराठी साहित्य संमेलन, परिषदेच्या माध्यमातून काम सुरू आहे. असे



सांगितले.

कार्यक्रमाचे दुसऱ्या सत्रात माय बोली मराठी विषयावर निबंध स्पर्धा संपन्न झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सुभाष कामडी यांनी केले तर आभार डॉ. सविता सिरसाठ यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला प्रा.बाळू धुम,प्रा.भगवान महाले, प्रा.देविदास साळुंखे, प्रा. देवचंद कवर, ओमकार धुम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुंजन गोळे एक 'हिरकणी' सुवर्णा नाईक निंबाळकर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सुनील भगत दक्षिण नागपूर**

**सरकारी नोकरी**

वयाच्या २१ व्या वर्षी सरकारी नोकरी, मानसन्मान, पैसाअडका असं सगळं स्वप्नवत असताना अचानक नोकरीचा राजीनामा देणाऱ्या मुलीला तुम्ही काय म्हणाल?...

कदाचित बेजाबदार किंवा लहरी म्हणाल.

पण, समाज 'ति'ला 'हिरकणी' म्हणतो आहे, 'द रियल हिरोज' या पुरस्काराने सन्मानित करतो आहे.

पोलीस निरीक्षक पदाची नोकरी सोडून अनेक अनाथ, गरीब, मनोरुग्णांसाठी कार्य करणारी 'द रियल हिरो'!

२७ डिसेंबर २०१६ ला 'ती' विवाहबंधनात अडकली. लग्नातील अनावश्यक खर्चाला फाटा देत तिने नोंदणी पद्धतीने लग्न करण्याचा निर्णय घेतला.

लग्नाच्या दिवशी तिने व तिच्या जोडीदाराने रक्तदान केले. एवढंच नाही, तर त्यांच्या लग्नाला आलेल्या इतर मंडळींनी देखील रक्तदान केलं.

अनाथ मुलींचे पालकत्व

सर्वात महत्त्वाचं म्हणजे लग्नाच्याच दिवशी या नवीन जोडप्याने ५ अनाथ मुलींचे पालकत्व घेऊन एक वेगळा आदर्श निर्माण केला.

कोण ही ती? ही आहे गुंजन गोळे. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात एका सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेली ही मुलगी आज तिच्या कर्तृत्वाने महाराष्ट्र गाजवते आहे. हो ! शब्दशः गाजवते आहे.

महिला ढोल पथक

गुंजनने अमरावतीत गवळीगड येथे महिला ढोल पथक सुरु केले आणि राज्यातील पहिले महिला ढोल पथक सुरू करण्याचा मान तिला मिळाला. या पथकात आज १५० महिला आहेत.

तत्त्वज्ञानामध्ये एम.ए. केल्यानंतर गुंजनने स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यास सुरुवात केली. प्रचंड कष्ट आणि मेहनतीने अभ्यास केला. युपीएससीमधील Combined Defence Services ची परीक्षा तिने दिली आणि ती उत्तीर्ण देखील झाली. त्यानंतर तिने पोलीस उपनिरीक्षकपदासाठी परीक्षा दिली आणि तिने त्यातही यश मिळवलं.

लहानपणी गुंजनने पाहिलेलं स्वप्न पूर्ण झालं. आईवडील आणि तिच्या स्वतःच्या कष्टाचं चीज झालं. गुंजन पोलीस निरीक्षक पदावर रुजू झाली.

दिवसरात्र मेहनत करून मिळवलेल्या नोकरीचा गुंजनने एक दिवस राजीनामा



दिला...! आश्चर्य वाटलं ना?

पण, हा राजीनामा नोकरीचा कंटाळा आला, काम जमलंच नाही, वरिष्ठांचा दबाव आला म्हणून दिला नव्हता. राजीनामा देण्यामागे एक विचार होता. एक ध्येय होतं. वेगळ करून दाखवण्याची जिद्द होती. समाजसेवेची ओढ होती. हे सगळं करण्यासाठी गुंजनला प्रेरित करणारा प्रसंगही तसाच घडला होता.

एके दिवशी रात्री ड्युटी आटोपून घरी परतत असताना गुंजनला एक मनोरुग्ण महिला अर्धनग्न अवस्थेत रस्त्याच्या कडेला दिसली. त्या महिलेच्या अंगावर जेमतेम कपडे होते. केस सुटलेले, अनेक दिवस अंघोळ न केल्याने ती विचित्र दिसत होती. त्यातच ती गरोदर आहे हे गुंजनच्या लक्षात आलं. नक्कीच कोणीतरी नराधमाने तिला आपल्या वासनेचं शिकार केलं असणार!

ते दृश्य बघून गुंजनला खूप रडू आलं. किळस वाटली. स्वत:ला माणूस म्हणवून घ्यायची लाज वाटायला लागली. गुंजनने सगळा धीर एकवटला. ती गाडीतून उतरली. त्या महिलेला घेऊन तिची योग्य ती सोय लावण्याचा तिने ठाम विचार केला आणि अजून एक विचार केला, तो म्हणजे अशा महिलांसाठी कार्य करण्याचा!

तिचा विचार पक्का झाला आणि अतिशय कष्टाने मिळवलेल्या नोकरीचा गुंजनने राजीनामा दिला. आधीची पोलीस निरीक्षक गुंजन आता रस्त्यांवरील मनोरुग्ण, वयस्क, अनाथ आजी-आजोबा, मुले यांचा आधार झाली.

आता गुंजनचा दिवस पहाटे केव्हा सुरू होतो आणि केव्हा संपतो हे तिला देखील कळत नाही. ती अमरावती परिसरातील गरीब-गरजू मुलांना सैनिक भरतीचे प्रशिक्षण देते. स्पर्धा परीक्षांचे क्लासेस घेते. ढोल पथकाचा सराव घेते. महिला व मुलींना स्वरक्षणाचे धडे देते. साहसी खेळ जसे लाठी-काठी, तलवारबाजी, दांडपट्टा हे शिकवण्याच्या कार्यशाळा महाराष्ट्रभर आयोजित करते. विशेष म्हणजे, या सगळ्यातून मिळणारे पैसे ती समाजकार्यात वापरते.

संध्याकाळी आपल्या दुचाकीवर बसून बिस्किटाचे पुडे, पाण्याच्या बाटल्या, छोटे हातरुमाल अशा विविध साहित्याने भरलेली बॅग घेऊन रस्त्यांवर कोणी उपाशी झोपले आहे का, थंडीत कुडकुडते आहे का? याचा ती शोध घेते आणि गरजुंना ते साहित्य देते.

आजवर कित्येक नवजात बालकांना तिने मृत्यूच्या जबड्यातून वाचवले आहे. अनैतिक संबंधातून जन्माला आलेल्या आणि रस्त्यावर फेकून दिलेल्या अनेक नवजात शिशुंना तिने जीवदान दिले आहे. तिच्या पुढाकाराने अनेक मनोरुग्ण, कृष्टरोगी यांच्यावर उपचार सुरू आहेत.

गिर्यारोहक

गुंजन एक उत्तम गिर्यारोहक देखील आहे! दरवर्षी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला ती कळसूबाईचे शिखर सर करते आणि कळसूबाईवर तिरंगा फडकावते. आतापर्यंत १४ वेळा तिने हे शिखर सर केले आहे.

गुंजनशी बोलताना तिचा बिनधास्त स्वभाव, समाजासाठी वाटणारी तळमळ शब्दाशब्दातून जाणवते. या मुलाखतीत तिने एकदाही स्वतःला मिळालेल्या कोणत्याही सन्मानांचा किंवा पुरस्कारांचा उच्चार देखील केला नाही.

ज्याप्रमाणे पाच मुली दत्तक घेतल्या तशाच ५०० मुली दत्तक घेण्याचा गुंजनचा मानस आहे. महाराष्ट्रात एकही मनोरुग्ण, अनाथ, वयोवृद्ध रस्तावर बेवारस अवस्थेत राहू नये. असं तिला मनापासून वाटतं. पैशाअभावी किंवा वेळीच उपचार न मिळाल्याने जेव्हा एखादा माणूस दगावतो तेव्हा ती स्वतःला फार असहाय्य समजते.

**द रियल हिरोज' या पुरस्काराने सन्मानित**

या सर्वांची दखल समाज कुठेतरी घेत होता. ८ जानेवारीला तिला 'द रियल हिरोज' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिच्यावर लिहिलेल्या 'काही देणं लागतो' या डॉ. सुभाष गवई यांच्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच पुण्यभूमी तपोवन येथे पार पडला. तिला 'हिरकणी' पुरस्काराने देखील गौरवण्यात आले आहे.

गुंजनने आतापर्यंत २ वेळा राष्ट्रीय रायफल शूटिंगमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे.

२६ जानेवारीच्या परेडमध्ये देखील तिला महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.एकाच वेळी घर, समाज आणि राष्ट्र अशा तीनही आघाड्यांवर आपल्या कार्यकर्तृत्वाने एक वेगळी मुद्रा उमटवणाऱ्या गुंजनला मन:पूर्वक शुभेच्छा.

# भारतात हृदयविकाराच्या मृत्यूत झपाट्याने वाढ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /रमेश औताडे** : जागतिक आरोग्य संघटनेनुसार दरवर्षी सुमारे १ कोटी ८० लाख मृत्यू हृदयरोगामुळे होतात. बदलती जीवनशैली, ताणतणाव, मधुमेह, उच्च रक्तदाब, धूम्रपान आणि चुकीची माहिती यांमुळे भारतातही हृदयविकाराचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत डॉ . कौशल छत्रपती यांनी याबाबत माहिती दिली.

जगभरात हृदयरोग हे मृत्यूचे प्रमुख कारण ठरत असताना, प्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. कौशल छत्रपती यांनी " हार्टस्ट्राँग " हे मार्गदर्शक पुस्तक प्रकाशित केले आहे.३१ वर्षीय एका तरुणाला हृदयविकाराचा झटका आला होता. तो दिसायला फिट असतानाही हा प्रकार घडला.




"फिट दिसणे म्हणजे आरोग्यदायी असणे नव्हे," असा महत्त्वाचा संदेश ते देतात.

रुथ अँड सोशल पब्लिकेशनतर्फे प्रकाशित झालेले हे पुस्तक पहिल्या आवृत्तीत हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यासाठी प्रत्येक कुटुंबासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# श्रीवर्धन नगर पालिका ॲक्शन मोडवर कधी? नागरिकांचा थेट सवाल"

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित** : श्रीवर्धन नगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्यानंतर शहरातील नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. प्रशासक कालावधीत अनेक विकासकामे हाती घेण्यात आली, काही पूर्ण झाली तर काही अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. मात्र या कामांपैकी काही कामे दर्जाहीन झाल्याच्या तक्रारी नागरिकांमधून पुढे येत आहेत. त्यामुळे नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी आता खऱ्या अर्थाने 'ॲक्शन मोड'मध्ये येण्याची गरज व्यक्त होत आहे.

प्रशासकीय कारभाराच्या काळात रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, स्वच्छता आदी कामांवर खर्च झाला; परंतु काही ठिकाणी कामाचा दर्जा समाधानकारक नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पावसाळ्यापूर्वीच काही रस्त्यांवर खड्डे पडल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे संबंधित कामांची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

नागरिकेत विविध विभागांमध्ये सभापतींची नेमणूक करण्यात आली आहे. या सभापतींनी आपल्या-आपल्या खात्यांतील कामांचा नियमित आढावा घेऊन त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. नगराध्यक्षांसह सर्व सभापतींनी शहरातील मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस निर्णय घेणे ही काळाची गरज आहे. केवळ बैठका न घेता प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पाहणी करून समस्यांचे तातडीने निराकरण करणे अपेक्षित आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान नगराध्यक्ष व नगरसेवकांनी नागरिकांना विविध आश्वासने दिली होती. शहरातील पाणीटंचाई, सांडपाणी व्यवस्थापन, कचरा समस्या, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, सार्वजनिक स्वच्छता व सार्वजनिक सुविधा यांसारखे मूलभूत प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. या सर्व समस्यांचा अभ्यास करून ठोस कृती आराखडा जाहीर करणे आवश्यक असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त होत आहे.

शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पारदर्शकता, जबाबदारी आणि जनसहभाग महत्त्वाचा आहे. नगरपालिकेने नियमित आढावा बैठक घेऊन कामांचा दर्जा तपासावा, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करावी आणि नागरिकांना कामांची माहिती खुल्या पद्धतीने द्यावी, अशी अपेक्षा आहे.श्रीवर्धनकरांचे एकच म्हणणे आहे – "आता वेळ आश्वासनांची नाही, तर कृतीची आहे." नव्या पदाधिकाऱ्यांनी आणि विभागीय सभापतींनी जनतेच्या विश्वासाला पात्र ठरत शहराच्या विकासासाठी ठोस व प्रभावी पावले उचलावीत, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# धानोरा फाट्यावर रंगणार 'शिवशक्ती'चा सोहळा!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड** : महाशिवरात्रीचे औचित्य साधून तालुक्यातील धानोरा फाटा येथील श्री क्षेत्र काशी विश्वेश्वर महादेव मंदिरात रविवारी (दि. १५) ५१ हजार पार्थिव शिवलिंग अर्चन आणि सिद्ध रुद्राक्ष वाटपाचा अभूतपूर्व सोहळा रंगणार आहे. बालयोगी महंत प.पू. श्री सर्वानंद सरस्वती महाराज यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या महोत्सवामुळे धानोरा नगरी शिवमय होणार आहे.

परमपूज्य ब्रह्मलीन काशीगिरी महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने आयोजित या धार्मिक उत्सवाचा प्रारंभ सकाळी १० वाजता रुद्र अभिषेक व रुद्र स्वाहाकाराने होईल. दुपारी १२ वाजता महंतांच्या हस्ते भाविकांना सिद्ध रुद्राक्षाचे वितरण केले जाणार असून, दुपारी २ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचे मुख्य आकर्षण असलेला ५१ हजार पार्थिव शिवलिंग अर्चन विधी रात्री ८ वाजता सुरू होईल. यावेळी रुद्र अभिषेक व षोडशोपचार महापूजा पार पडणार असून, मध्यरात्री १२ वाजता भव्य महाआरतीने सोहळ्याची सांगता होईल.

या भक्तीमय सोहळ्याचा शिवभक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

# शिक्षण सभापती पदी निवड झाल्याबद्दल अशांतभाई वानखेडे यांचा हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे सत्कार




**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले** : नगरपालिका स्थायी समिती निवड प्रक्रियेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून पहिले निवडून आलेले अविरोध नगरसेवक अशांतभाई वानखेडे यांची शिक्षण सभापती पदी निवड झाल्याबद्दल हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे न. प. शिक्षण सभापती दालनात त्यांचा सत्कार करण्यात आला.

अशांतभाई वानखेडे यांनी शिक्षण सभापती पदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर नगरपरिषद येथे हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले . महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष धनश्रीताई काटीकर पाटील यांनी पत्रकार संघाच्या वतीने अशांतभाई वानखेडे यांचा सत्कार केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या , याप्रसंगी सतीश दांडगे, प्रा प्रकाश थाटे, उल्हासभाई शेगोकार, नथुजी हिवराळे, डॉ.अशोक सुरडकर, श्रीकृष्ण तायडे, सुधाकर तायडे, कडू फुलपगारे, सय्यद ताहेर, प्रदीप इंगळे, आत्माराम मोरे, किशोर सोनवणे यांची उपस्थिती होती.

# ग्रामपंचायत पंचायत कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन १६पासुन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी भावेश धंधुकिया भंडारा** : लाखनी तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे दिनांक १६फ फेब्रुवारी २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करणार असल्याचे लाखनी तालुका कामगार सेनेच्या वतीने पंचायत समिती लाखनी गटविकास अधिकारी संदीप पानतावणे यांना निवेदन देऊन त्यांच्या मागण्या पूर्ण करुन न्याय देण्याची मागणी केली आहे.

मागील १९ महीन्याचे थकीत मानधन तात्काळ देण्यात यावे. राहानिमान भत्ता अजून पर्यंत मिळाला नाही तो देण्यात यावा, भविष्य निर्वाह निधी २ वर्षापासून भरलेले नाही ते भरण्यात यावे , मार्च २०१९ कोरोनाचे २ वर्षाचे मानधन अजून पर्यंत मिळाले नाही ते देण्यात यावे, प्रत्येक महिन्याची पगाराची डिमांड जिल्हा परिषद ला पाठविण्यात यावी , सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचे थकबाकी असलेले मानधन व इतर सर्व थकबाकी भत्ता देण्यात यावे , अशा अनेक मागण्या तात्काळ पूर्ण करुन आम्हा कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची




पंचायत समिती लाखनी गटविकास अधिकारी संदीप पानतावणे यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे . अन्यथा दिनांक १६ फेब्रुवारी २०२६पासुन पंचायत समिती समोर बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करणार असल्याचे तालुका कामगार सेनेच्या वतीने निवेदन देऊन माहिती देण्यात आली आहे यावेळी कामगार सेनेचे पदाधिकारी व अनेक कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# आशा सेविका पदभरती संदर्भात तालुका आरोग्य अधिकारी यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा प्रतिनिधी/ रमेश सुरशे**/छत्रपती संभाजीनगर घनसावंगी तालुक्यातील पारडगांव येथील आरोग्य उपकेंद्रात रिक्त असणाऱ्या आशासेविका या पदासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातर्फे भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.या भरती प्रक्रियेमध्ये गावातील स्थानिक असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य द्यावे.मागील वीस ते पंचवीस




वर्षांपासून इतर ठिकाणी स्थलांतरित असलेले परंतु सध्या भरती प्रक्रिये दरम्यान आपले वर्चस्व दाखवुन किंवा वरिष्ठांशी संगणमत करून किंवा राजकीय बळाचा वापर करून अशासेविकेचे पद हडप करण्याचा प्रयत्न काही उमेदवार करत आहेत. त्यासाठी या भरती प्रक्रियेमध्ये कुठल्याही प्रकारची तडजोड न करता अत्यंत पारदर्शकपणे या अशासेविकापदी निवड गावातीलच रहिवासी महिलेची करावी व ती कायमस्वरूपी गावात रहिवासी असावी. अशी मागणी असणारे निवेदन सेक्युलर रिपब्लिकन फेडरेशन ऑफ इंडिया या सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील सुतार यांनी माननीय तालुका आरोग्य अधिकारी,जिल्हा आरोग्यअधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे,निवेदनावर सेक्युलर रिपब्लिकन फेडरेशन ऑफ इंडिया या सामाजिक संघटनेचे जिल्हा सचिव रमेश सुरशे,विकी गायकवाड,आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# मोर्शी तालुक्यातील कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडीत पक्षप्रवेश

**दैनिक युवक आधार**

**विदर्भ संपादक ज्योत्सना करवाडे** : मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर जिल्हा परिषद सर्कल मधील सामाजिक कार्यकर्ते दिनेश वानखडे, सतिषभाऊ बंग, नरेंद्र खराते यांचेसह इतर कार्यकर्त्यांनी आज वंचित बहुजन आघाडीचे अमरावती जिल्हाध्यक्ष राहुलभाऊ मेश्राम यांचे हस्ते पक्षप्रवेश केला.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष तथा रिद्धपूर उपसरपंच विलासभाऊ वानखडे, युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते, अमोल सरवटकर, दिनेश इंगळे, आदर्श शेंडे, सह




तिवसा तालुका महासचिव अमोल जवंजाळ, शैलेश बागडे, संदेश ढोके उपस्थित होते. रिद्धपूर सर्कल मधील प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमुळे वंचित बहुजन आघाडीची ताकद वाढली असून कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# विना लायसन्स वाहनचालकांवर पनवेल वाहतूक शाखेची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** आज रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. औदुंबर भा. पाटील (पनवेल वाहतूक शाखा) यांच्या आदेशान्वये विशेष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान VK हायस्कूल, वडाळा तलाव परिसर येथे विना लायसन्स व इतर मोटर वेहिकल कलमांतर्गत वाहन चालवणाऱ्या चालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई



करण्यात आली.सदर कारवाईमुळे वडाळा तलाव परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली असून परिसरात सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली आहे. वाहतूक नियमांचे पालन व्हावे व अपघातांना आळा बसावा या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली.ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने तसेच वाहतूक शाखेतील पोलीस अंमलदार युवराज येळे, अमीर मुलाणी, ज्ञानेश्वर पवार, संदीप काळे यांच्या पथकाद्वारे करण्यात आली.

# गोंदियाला कमी व्होल्टेज व वीज खंडित होण्यापासून मिळणार दिलासा

## भारवाढीसाठी प्रत्येक उपकेंद्रात डबल पॉवर ट्रान्सफॉर्मर – आ. विनोद अग्रवाल

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/जिल्हा प्रतिनिधी गोंदिया** : दररोज वाढत चाललेली कमी दाबाची समस्या, वीज खंडित होणे, लोडशेडिंग, ट्रान्सफॉर्मर जळणे यामुळे गोंदिया शहर आणि ग्रामीण भागातील नागरिकांचा त्रास शिगेला पोहोचला होता. वीज खंडित होण्याचा सर्वात मोठा परिणाम जलपुरवठ्यावर आणि शेतकऱ्यांच्या सिंचनावर होत होता. यामागील मुख्य कारण म्हणजे कमी क्षमतेचे मेगावोल्ट-अँपिअर (MVA)चे ट्रान्सफॉर्मर. वाढती लोकसंख्या आणि वाढता वीज वापर असूनही गेल्या 50 वर्षांत यामध्ये कोणताही बदल झाला नाही, त्यामुळे आजची परिस्थिती निर्माण झाली.

या सर्व समस्यांची जाणीव ठेवून, गोंदिया शहरासह संपूर्ण गोंदिया विधानसभा क्षेत्रात अखंड आणि उच्चस्तरीय वीजपुरवठा मिळावा यासाठी आमदार विनोद अग्रवाल पुढे सरसावले आणि गेल्या दोन वर्षांत 50 वर्षांनंतर गोंदियाची वीजव्यवस्था



बदलताना दिसत आहे.

आमदार अग्रवाल यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आज गोंदिया शहरात वीजभार कमी करण्यासाठी अधिक क्षमतेचे मेगावोल्ट-अँपिअरचे ट्रान्सफॉर्मर बसवले जात आहेत. शहराच्या मध्यभागी नवीन सबस्टेशन तयार केले जात आहे. सूर्याटोला उपकेंद्रात अतिरिक्त 10 MVA चा ट्रान्सफॉर्मर वाढवण्यात आला आहे. तसेच फुलचूर व भीमघाट परिसरातही नवीन उपकेंद्रांची उभारणी सुरू आहे. लवकरच वीजेच्या लपंडावापासून गोंदियाला पूर्णतः मुक्त करण्याचे प्रयत्न सुरू असून त्यात गती आली आहे.

याचबरोबर चंगेरा येथील मंजूर विद्युत उपकेंद्राचे कामही मार्गस्थ झाले आहे. दासगाव, काटी, परसवाडा, कटंगटोला, रापेवाडा, मुंडीपार MIDC या उपकेंद्रांची भारक्षमता दुप्पट करण्याचे काम सुरू आहे. ज्या उपकेंद्रांवर 5 MVA चे ट्रान्सफॉर्मर होते, त्यांना 10 MVA किंवा दोन उच्चस्तरीय 5 MVA चे ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे काम सुरू आहे.

अलीकडेच आमदार अग्रवाल यांनी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री. राठौर आणि कार्यकारी अभियंता श्री. जैन यांची भेट घेऊन कामांचा आढावा घेतला. या दरम्यान त्यांनी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशीही फोनवर चर्चा करून कामांना गती देण्याचे निर्देश दिले. DPDC मधील निधीअभावी अडलेल्या कामांना गती देण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे आदेशही दिले.

आमदार अग्रवाल म्हणाले, मुंडीपार येथील 132 केव्हीच्या EHV वर मोठा भार आहे. हा भार कमी करण्यासाठी एका नवीन 132 केव्ही सबस्टेशनच्या उभारणीसाठी प्रयत्न सुरू असून लवकरच त्यात सफलता मिळेल. ज्या भागात 25 किंवा 75 KVA चे ट्रान्सफॉर्मर आहेत, त्यांना 100 KVA करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

यापूर्वी हिवरा आणि झिलमिली उपकेंद्रांमध्ये 10 MVA चे उच्चस्तरीय ट्रान्सफॉर्मर बसवून या कामाची सुरुवात झाली आहे.आगामी काळात गोंदिया राज्यातील सर्वात सक्षम आणि सज्ज वीजव्यवस्था असलेला जिल्हा बनवणे हाच आमचा प्रयत्न असल्याचेही ते म्हणाले.

# परभणीत भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी काँग्रेसने शिवसेना (उबाठा)ला पाठिंबा देऊन आघाडी धर्म पाळला: हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** चंद्रपुरात शिवसेना (उबाठा) ने भाजपाला पाठिंबा देऊन आघाडीचा धर्म पाळला नाही पण काँग्रेसने मात्र परभणी महापौरपदाच्या निवडणुकीत आघाडीचा धर्म पाळला आहे. परभणीमध्ये शिवसेना (उबाठा)चा महापौर व काँग्रेसचा उपमहापौर झाला आहे. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी, इंडिया आघाडी, मविआ, लोकशाही तसेच संविधानासाठी काँग्रेसच्या सर्व १२ नगरसेवकांनी शिवसेना (उबाठा)ला मतदान केले, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन



सपकाळ यांनी म्हटले आहे.

बुलढाणा येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, चंद्रपूर महानगरपालिकेत शिवसेना (उबाठा) ने जी भूमिका घेतली त्याची सल असण्याची अथवा बदला घेण्याची भूमिका व संस्कृती काँग्रेसची नाही. चंद्रपुरात शिवसेना (उबाठा) चे ८ नगरसेवक असताना त्यांनी भाजपाला मतदान केले हे राजकीय दृष्टीकोनातून चुकलेले आहे, आणि त्याचे पक्ष पातळीवरून समर्थन केले जाते, काँग्रेसची लाज काढली जाते, या चोराच्या उलट्या बोंबा आहेत.

चंद्रपुरसंदर्भात खासदार संजय राऊत यांच्यासोबत काँग्रेसच्या नेत्यांनी चर्चा केली होती, काँग्रेसचे नेते शिवसेना (उबाठा) शी सातत्याने संपर्कात होते असे असताना संजय राऊत व त्यांच्या पक्षातील लोकांनी जी वक्तव्ये केली ती चुकीची असून, आघाडी धर्माला शोभणारी नाहीत. वंचित बहुजन आघाडी हा काँग्रेसचा मित्र पक्ष आहे, त्यांचे २ नगरसेवकर गैरहजर राहिले, त्यांना पक्षाने बडतर्फ केले तसेच शहराध्यक्षांवरही कारवाई केली पण (शिवसेना) उबाठाने मात्र कोणतीच कारवाई केली नाही, उलट त्याचे समर्थन केले, हे काँग्रेस पक्ष कदापी सहन करणार नाही.

परभणीत काँग्रेसचा महापौर करण्यासंदर्भात आमच्याकडे प्रस्ताव होता पण सत्तेसाठी वाट्टेल ते ही काँग्रेस पक्षाची भूमिका नाही. आम्ही सत्तेला लाथाडून आघाडी धर्म पाळला व शिवसेना (उबाठा) च्या पाठीशी उभे राहिलो. आघाडीत शिवसेना(उबाठा) काँग्रेसची मते घेते पण काँग्रेसला मत देत नाही यावर चंद्रपूर व परभणीतील घडामोडींनी शिक्कामोर्तब केले आहे, असेही सपकाळ म्हणाले.

# विजयाची सुवर्णगाथा जि. प. कें. प्रा. शा. भारज बु. जिल्ह्यात प्रथम!

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ज्ञानेश्वर निकाळजे :** अतिशय आनंदाची आणि अभिमानाची बातमी! हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर जिल्हास्तरीय वाद-विवाद स्पर्धेत इयत्ता ६ वी ते ८ वी गट, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा भारज बु. ता. जाफराबाद, जि. जालना येथील विद्यार्थिनींनी आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या जोरावर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

**यशस्वी रत्न:**

*कु.सोनल विष्णू नाईक*

*कु.आरती रामेश्वर पायघन*

या यशाचे खरे शिल्पकार जि. प. कें. प्रा. शा. भारज बु. येथील सर्व शिक्षक वृंद आहेत. सर्व शिक्षकांच्या सामूहिक परिश्रमातून, मार्गदर्शनातून आणि दिलेल्या प्रोत्साहनामुळेच आज आपल्या शाळेचा डंका जिल्हास्तरावर वाजत आहे.



तालुक्याचा आणि शाळेचा गौरव वाढवणाऱ्या या रणरागिणींचे आणि त्यांना घडवणाऱ्या सर्व गुरुजनांचे जिल्हाभर कौतुक होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल भारत बुद्रुक नगरीचे प्रथम नागरिक सो शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे. माजी सरपंच तुळशीराम पायघन शालेय समिती अध्यक्ष शरद तेलंग्रे उपाध्यक्ष प्रदीप नरवाडे सर्व सदस्य तसेच माजी अध्यक्ष रामभाऊ सुरडकर गणेश काटकर विलास क्षीरसागर राजेश दामदर नानाभाऊ बोडके पोलीस पाटील संजय तेलंग्रे पत्रकार शंकर डब्बे यांच्यासह अनेक नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून खूप खूप शुभेच्छा दिल्या

# सणसर येथे संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम अपूर्ण

## सणसर येथील नागरिकांचे धुळीने आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथे संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम अपूर्ण राहिल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे.रस्त्यावर पडलेली धूळ व खडी यामुळे वाहनचालकांसह पादचारी त्रस्त झाले आहेत.दिवसभर धुळीचे लोट उडत असल्याने सणसर ग्रामस्थाना श्वसनाचे आजार होऊन रुग्ण संख्या वाढल्याचे जाणवायला लागले आहे.

स्थानिक नागरिकांनी व ग्रामपंचायत प्रशासन यांनी वारंवार तक्रारी करूनही काम पूर्ण न झाल्यामुळे राष्ट्रीय महामार्गच्या अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली आहे. महामार्गाच्या दुतर्फा राहणाऱ्या लोकांच्या घराजवळ गटर लाईन केली नसल्यामुळे घाणीचा त्रास सहन करावा लागत असून,लहान मुलं व ज्येष्ठ नागरिक यांची विशेषतः गैरसोय होत असून त्यांचे आरोग्य धोक्यात येत असून रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे

काम वेळेत पूर्ण न झाल्यामुळे वाहतुकीतही अडथळे निर्माण होत आहेत. अपूर्ण कामामुळे खड्डे व असमान रस्ता तयार झाल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे.

नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाकडे तातडीने काम पूर्ण करण्याची मागणी केली असून,अन्यथा सणसर ग्रामस्थ लवकरच तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा सरपंच यशवंत पाटील व ग्रामस्थ यांनी दिला आहे.

# रिसोड येथे महिला व बालकांच्या कायद्यांवर जनजागृती व प्रशिक्षण कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. प्रतिनिधी/रणजित. ठाकूर** वाशिम, दि. ११ फेब्रुवारी ((जिमाका)

महिला व बालविकास विभागांतर्गत महिला व बालकांशी संबंधित विविध कायदे व योजनांविषयी जनजागृती व प्रशिक्षण कार्यशाळा दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी रिसोड येथील पंचायत समिती सभागृहात उत्साहात पार पडली.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या निर्देशानुसार या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील शिक्षक, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आरोग्य विभागातील कर्मचारी तसेच पोलीस विभागाचे कर्मचारी यांना महिला व बालकांशी संबंधित कायद्यांची अचूक माहिती मिळावी, कायदेशीर प्रक्रिया समजावी तसेच संवेदनशील प्रकरणांमध्ये समन्वयाने प्रभावी कार्यवाही व्हावी हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यशाळेस मार्गदर्शन करताना प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा प्राधिकरण, रिसोड सपकाळ यांनी विविध कायद्यांतील तरतुदी, तक्रार नोंदणी प्रक्रिया तसेच पीडितांना मिळणाऱ्या कायदेशीर संरक्षणाबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, बाल विकास प्रकल्प अधिकारी गिऱ्हे, परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे, ॲड. भराड, तालुका संरक्षण अधिकारी बंडू धनगर, कायदा तथा परिविक्षा अधिकारी



जिनसाजी चौधरी, निती आयोग जिल्हा प्रकल्प सहाय्यक, नीलिमा भोंगाडे तसेच सखी वन स्टॉप सेंटरच्या समुपदेशक अश्विनी बर्डे यांनी उपस्थितांना विविध कायदे व योजनांबाबत मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३, बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ या महत्त्वाच्या कायद्यांची माहिती देण्यात आली.

तसेच मिशन वात्सल्य व मिशन शक्ती अंतर्गत कार्यरत सखी वन स्टॉप सेंटर, शक्ती सदन, बाल संगोपन योजना आणि चाइल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल-फ्री क्रमांकाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला व बालविकास विभागातील रामेश्वर वाळले, अजय यादव, रमेश वाघ व अविनाश सोनुने यांनी पुढाकार घेतला.

# उरण नगर परिषदेमध्ये घनकचरा व्यवस्थापनाचे तीन तेरा !

**दैनिक युवक आधार**

**उरण शहरप्रतिनिधी/ सायलीसाळुंके** : उरण नगर परिषदेमध्ये अनेक वर्षे काम करणाऱ्या दलीत, आदिवासी गोरगरीब कंत्राटी सफाई कामगार कार्यरत आहेत या कंत्राटी कामगारांनी कोवीड मध्ये देखील जीवाची बाजी लावून काम केले . खालील समस्या सोडविण्यासाठी “आरमण उपोषण” जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग येथे सुरू झाले आहे.

1) 1 1 कंत्राटी सफाई कामगारांना तात्काळ रूजू करून घेणे.





2) मागील में. भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट या कंपनीने तीन वर्षे नियमानुसार PF भरलेला नाही. 3) २ वर्षांचा बोनस दिलेला नाही 4) मृत कंत्राटी सफाई कामगारांच्या वारसांना ESIC योजनेचा लाभ मिळालेला नाही. 5) में. समिक्षा एंटरप्राईजेस या नवीन ठेकेदाराने 5 महिन्यांचा PF भरलेला नाही. 6) में. समिक्षा एंटरप्राईजेस या कंपनीने कामगारांना ESIC या योजनेचे कार्ड दिलेले नाही.

घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी लाखो रूपये अधिकचे खर्च करून काम दिले जाते. ठेकेदार मात्र 10% घरोघरी आणि 90 % कचरा भर रस्त्यावर. कमीत कमी कामगार वापरून अधिकाधीक नफा मिळवण्याचे काम अतीशय राजरोसपणे ठेकेदार मे. समिक्षा एंटरप्राईजेस, करत आहे. उरण नगर परिषद प्रशासन मात्र मौन पाळून शांत का ? हा प्रश्नाबाबत जनतेच्या मनात संतापाची लाट असली तरी ही वादळा पुर्वीची शांतता आहे.

# सत्काराला फाटा देत शाळेसाठी ५ हजारांची देणगी; अंभोरा येथील बोकडे कुटुंबाचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे** : पिंपरखेड येथे नुकत्याच पार पडलेल्या शुभविवाह प्रसंगी एक समाजोपयोगी आणि प्रेरणादायी उदाहरण समोर आले. अंभोरा येथील नवनाथ बोकडे व त्रिंबक बोकडे यांनी आपल्या मुलीच्या लग्नामध्ये होणाऱ्या सत्कार खर्चाला फाटा देत ५,००० रुपये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रगतीसाठी देणगी म्हणून शाळेकडे सुपूर्द केले.याबाबत सविस्तर माहिती अशी की, नुकत्याच पार पडलेल्या या विवाह सोहळ्यात



मच्छिंद्र काका खाकाळ यांनी “सत्कारासाठी खर्च करण्यापेक्षा ती रक्कम शाळेसाठी दिली तर ती विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयोगी पडेल,” अशी संकल्पना मांडली. या विचाराला सकारात्मक प्रतिसाद देत मुलीचे वडील नवनाथ बोकडे यांनी तत्काळ शाळेसाठी देणगी देण्याचा निर्णय घेतला. ही रक्कम शाळेच्या स्वाधीन करण्यात आली.या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने –बोकडे कुटुंबाचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. गावातील नागरिकांनीही या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत “वैयक्तिक आनंदाच्या क्षणीही समाजासाठी हातभार लावण्याची ही कृती इतरांसाठी प्रेरणादायी आहे,” अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.हा उपक्रम ग्रामीण भागातील शिक्षणवृद्धीसाठी मोलाचा ठरेल, असा विश्वास शाळा व्यवस्थापन व ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबतच्या करारांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास महाराष्ट्रभर पोहोचविणार

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टचे सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षांपासून टाटा ट्रस्ट सोबत शासन काम करीत आहे. केवळ निधी देऊन भागीदारी होत नाही, तर काम करून समाजात सकारात्मक प्रभाव पाडणारी भागीदारी टाटा करत असते. हे बहु-आयामी करार माता, नवजात बालक, बाल आणि किशोरवयीन घटकांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे, खुंटलेली वाढ रोखून कुपोषणावर उपाय शोधण्यासाठी मदतगार ठरतील. या सोबतच पोषणासाठी आहारात वैविध्य आणणे, जलस्रोतांचे अधिक शाश्वतपणे जतन आणि व्यवस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रात हवामान आधारित कृषी



आणि पशुधन विकासाला चालना देण्याची क्षमता या भागीदारीत आहे.

नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे , नाला,नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. राज्यात जलयुक्त शिवार योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. ही योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत जनतेची योजना झाली. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा ट्रस्टचीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

टाटा ट्रस्ट चे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे. सर्व सामान्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासनाचे विविध विभाग आणि समुदायांसोबत सकारात्मक परिणाम आणण्याचा हेतू असणार आहे. शासन आणि टाटा ट्रस्ट्स यांनी आज राज्याच्या एकात्मिक विकासाला पाठबळ देण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करून धोरणात्मक भागीदारी अधिकृत केली आहे. नाम फाउंडेशनचे नाना पाटेकर यांनीही शासनासोबत जलसंधारण क्षेत्रात काम करण्यास मदत मिळत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव (आरोग्य) डॉ. निपुण विनायक, सचिव (महिला व बालविकास) अनुपकुमार यादव, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धार्थ शर्मा आदींसह टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन च पदाधिकारी उपस्थित होते.

### कराराचा उद्देश

सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी' याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.

### सामंजस्य करारांची व्याप्ती

माता, नवजात बालक, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे; टेलिमेडिसिनसह इतर माध्यमांतून उपचार सहज देणे, शहरी आणि दुर्गम भागातील सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा वाढवणे, एकात्मिक आपत्कालीन व्यवस्थापन सेवाद्वारे उत्तम आपत्कालीन प्रतिसादास पाठबळ देणे. दोन वर्षांखालील मुलांमधील खुंटलेली वाढ, कमी वजन आणि कुपोषण रोखण्यास मदत करणे, किशोरवयीन कुपोषण आणि रक्तक्षय दूर करणे, गडचिरोली सारख्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून 'टेक-होम रेशन' सारख्या योजनांचे वितरण मजबूत करणे, तलावांचे पुनरुज्जीवन, जलकुंभ आणि नद्यांमधील गाळ काढणे, भूजल पुनर्भरण सुधारणे, मराठवाडा आणि विदर्भासह पाणीटंचाईग्रस्त भागांवर विशेष भर देऊन मृद व जलसंधारण योजनांची अंमलबजावणी करणे, हवामान बदलांचा अभ्यास करून शेतीला प्रोत्साहन देणे, वन-आधारित आणि ग्रामीण बिगर-शेती उपजीविकेला पाठबळ देणे, आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता आणि उपजीविका या सर्वांना एकत्र आणणारा एकात्मिक ग्राम विकास साधणे.

### असे आहेत करार

टाटा ट्रस्टच्या सोबत शासनाने एकूण १२ करार केलेले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सोबत सामंजस्य करारांचा समावेश आहे. तसेच नाम फाउंडेशनचा जलसंधारण विभागासोबत करार करण्यात आला आहे.

---

# संत सेवालाल महाराज जयंती महोत्सवासाठी जिल्हा प्रशासन सज्ज –जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांची प्रत्यक्ष पाहणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम,१४ फेब्रुवारी रोजी साजरा होणारा श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६ हा जिल्ह्याच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव करणारा व पर्यटन विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, या महोत्सवाच्या नियोजनात कोणतीही त्रुटी राहू नये व उणिवांची तात्काळ पूर्तता करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी पोहरादेवी येथे प्रत्यक्ष भेट देऊन कार्यक्रमस्थळाची सखोल पाहणी केली व विविध विभागांच्या तयारीचा आढावा घेतला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, कारंजा उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, पर्यटन विभागाचे उपसंचालक विजय जाधव,



महावितरणचे कार्यकारी अभियंता जीवन चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप आदी उपस्थित होते. काही यंत्रणांचे प्रमुख दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, महोत्सवाच्या कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती अपेक्षित आहे. त्यामुळे सुरक्षा, वाहतूक, आरोग्य सेवा व आपत्कालीन व्यवस्थापन या सर्व बाबींमध्ये कोणतीही कमतरता राहू नये. सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध व जबाबदारीने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, गर्दी नियंत्रण, वाहतूक सुरळीत राहण्यासाठी पर्यायी मार्ग निश्चित करणे व वाहनतळ व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

आरोग्य विभागाने वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व प्राथमिक उपचार केंद्रे सज्ज ठेवावीत, तर सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यक्रमस्थळ व संपर्क रस्त्यांवरील कामे वेळेत पूर्ण करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, वाहनतळ व वाहतूक नियोजन यांचा मास्टर प्लॅन व नकाशाद्वारे सखोल आढावा घेऊन त्यानुसार अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

“भाविकांना सुरक्षित, सुव्यवस्थित व सुसह्य वातावरण उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे,” असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी केले.

या अनुषंगाने कार्यक्रमस्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सूचना देण्यात आल्या. नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी वेळेत होण्यासाठी क्षेत्रस्तरावर सजग राहण्याचे निर्देशही देण्यात आले.महोत्सवाच्या अनुषंगाने सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडून भाविकांसाठी सुरक्षित, सुव्यवस्थित व सुसह्य वातावरण निर्माण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी यंत्रणांना केले. यावेळी संबंधित नोडल अधिकारी, विश्वस्त व ट्रस्टी उपस्थित होते.

# हायवे वरील धाब्या समोरील माती मुळे अपघाताची भीती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/कळमनुरी** - (NH-161)महामार्गावर प्रवास करताना आता केवळ अपघात वेगानेच नाही तर हायवेच्या कडेला असलेल्या हॉटेल्स आणि धाब्यांसमोर वाहनांच्या येण्या-जाण्यामुळे टायरने मोठ्या प्रमाणात धूळ रस्त्यावर येत आहे. मेन रोड असून सुद्धा आठ ते दहा फूट पर्यंत माती दिसत आहे. यामुळे साईड ने चालणाऱ्या बाईक स्वारला गाडी चालवताना स्लिप होऊन अपघात होण्याची भीती वाढली आहे. रात्री ला तर बाईक चालवणे धोक्याचे झाले आहे धाबे चालवणाऱ्या मालक यांच्या निष्काळजीपणामुळे भीषण अपघातांची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

महामार्ग लगत बरीच धाबे हॉटेल्स उभी राहिली आहेत. मात्र , कामठा फोटा ते मालेगाव फाटा या मध्ये अनेक धाब्या/



हॉटेलच्या समोरचा परिसर अनेकदा कच्चा असतो किंवा तिथे योग्य पेविंग केलेले नसते. जेव्हा जड वाहने किंवा गाड्या या हॉटेल्समध्ये थांबण्यासाठी हायवेवरून खाली उतरतात, तेव्हा तिथे साचलेली माती टायरने मेन रोडवर जाते व जास्त जड वाहतूक असल्यामुळे बाईक चालवणाऱ्यांना साईडनेच चालवे लागते व अचानक त्या धुळीत गाडी स्लिप होऊन अपघाताचा धोका वाढताना दिसतो आहे. जड वाहन त्या मातीतून गेले तर त्या धूळीने मागच्या वाहनाना समोरील काहीही दिसत नाही त्या मुळे खूप धोका निर्माण होत आहे

स्थानिक नागरिकांचे मत:

"धाबे/हॉटेल मालकांनी त्यांच्या समोरील भागात पाणी मारणे किंवा तिथे डांबरीकरण करणे गरजेचे आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहोत का?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून होत आहे.

प्रशासनाची जबाबदारी:

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि स्थानिक प्रशासनाने अशा धाबे / हॉटेल्सवर कारवाई करणे किंवा त्यांना रस्ता सुरक्षित ठेवण्याबाबत नोटीस बजावणे आवश्यक आहे.श्री रामदेव बाबा रायका राजस्थानी धाबा जरोडा फाटा येथे रोडवर जमा झालेली माती

---

# परिवहन मंत्री श्री.प्रताप सरनाईक यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराज मुर्तीची प्राणप्रतिष्ठा

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत/कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : फेब्रुवारी रोजी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते घोडबंदर मठातील श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साही वातावरणात पार पडला. मागील वर्षी गुरुवार ४ डिसेंबर २०२५ रोजी श्री दत्त जयंतीच्या दिवशी श्री स्वामी समर्थ मठ या नवीन वास्तूचा लोकार्पण सोहळा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्तेच करण्यात आला होता.

त्याच घोडबंदर मठाच्या नवीन वास्तूमध्ये सोलापूरचे गुरुवर्य विजूदादा कडलास्कर, अहिल्यानगरचे गुरुवर्य अशोक दादा जाधव , त्र्यंबकेश्वर चे अरुण कन्नव गुरुजी, देवेंद्र कन्नव गुरुजी, भिवंडी चे राजहंस गुरुजी, डॉ.राजाराम माने, हायवे दिवेचे विशाल पाटील, मुलुंडचे चंद्रकांत पाटील, मनोहर उतेकर तसेच या मठाचे अध्यक्ष विकासदादा मारुती पाटील आणि शेकडो स्वामी भक्तांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ८ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना



भक्तीभावाने करण्यात आली.यावेळी मूळ श्री स्वामी समर्थ महाराजांची प्रतिमा, मुळ अक्कलकोटच्या पादुका आणि इतर सर्व देवांच्या मूर्तींची स्थापनाही करण्यात आली. तसेच सद्गुरू गजानन महाराजांच्या प्रकट दिनाचे औचित्य साधून श्री स्वामी समर्थ महाराजांचा महामस्तक अभिषेक नवीन वास्तूत आनंदमय वातावरणात पार पडला.

श्री स्वामी समर्थ घोडबंदर मठाचे विकासदादा मारुती पाटील यांनी प्रताप सरनाईक यांचे भव्य स्वागत केले. हा सोहळा यशस्वी रीत्या पार पडण्यासाठी घोडबंदर मठाची संपुर्ण कार्यकारिणी व भक्तगण यांनी परिश्रम घेतले. साजन कासार, रवि घरत, भगवान देवकाते व इत्यादींचेही विशेष सहकार्य लाभले.

# आष्टीत राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या मंडप व संपर्क कार्यालयाचे युवा नेते अभय धोंडे यांच्या हस्ते झाले उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : आष्टी येथे आयोजित डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन दि. १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे.या कृषी प्रदर्शनाच्या मंडप व संपर्क कार्यालयाचे उद्घाटन युवा नेते अभय धोंडे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व प्रशासन अधिकारी,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आष्टी कृषी महाविद्यालय हे सतत कृषी प्रदर्शन भरणारे महाराष्ट्रातील पहिले कृषी महाविद्यालय असे डॉ.डी.बी. राऊत यावेळी प्रशासन अधिकारी डॉ.डी.बी.राऊत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,आष्टी कृषी महाविद्यालय हे सातत्याने राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरविणारे महाराष्ट्रातील पहिले कृषी महाविद्यालय आहे.शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आणि शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी हे प्रदर्शन अत्यंत उपयुक्त ठरत आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव, संशोधनाची दिशा आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याचे कार्य या माध्यमातून प्रभावीपणे होत आहे असे त्यांनी नमूद केले.






त्यांनी पुढे सांगितले की,या प्रदर्शनामुळे शेतकरी व विद्यार्थी यांच्यात थेट संवाद निर्माण होतो आणि आधुनिक शेती तंत्रज्ञान गावागावात पोहोचते.धोंडे यांच्या दूरदृष्टीमुळे आणि शेतकरी हिताच्या विचारातून हा उपक्रम अधिक व्यापक होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. १७५ स्टॉल बुक झाले आहेत. प्रदर्शनामध्ये अजूनही विविध स्टॉलचे बुकिंग सुरू आहे. महाराष्ट्रासह इतर राज्यांमधील कृषी क्षेत्राशी संबंधित उद्योजक व संस्था सहभाग नोंदवत आहेत. प्रदर्शनात विविध पिकांची लागवड पद्धती,सुधारित बियाणे,आधुनिक सिंचन व्यवस्था, ठिबक व तुषार सिंचन,सेंद्रिय शेती, शेती यंत्रसामग्री, पशुपालन, मत्स्यपालन,कृषी प्रक्रिया उद्योग याबाबत सविस्तर माहिती देण्यात येत आहे.अजय वाबळे यांनी सांगितले की, पाणी व्यवस्थापना पासून ते शेतीसाठी लागणाऱ्या आधुनिक साहित्यापर्यंत सर्व विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान, प्रात्यक्षिके आणि चित्रफितींच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान समजावून सांगितले जाणार आहे. घरगुती शेती उपाय,सेंद्रिय कीड नियंत्रण,खत व्यवस्थापन यांसारख्या विषयांवरही मार्गदर्शन उपलब्ध आहे.या प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना थेट तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळत असून शेतीतील खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याचे मार्ग समजणार आहेत. कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही या प्रदर्शनाच्या प्रचार-प्रसारात सक्रिय सहभाग घेतला असून शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम प्रभावीपणे पार पाडले आहे.

आष्टी कृषी महाविद्यालयाच्या या उपक्रमामुळे तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नवी दिशा मिळत असून शेती क्षेत्राच्या प्रगतीसाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरत आहे. राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाला शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सरला माहेश्वरी दु:खद निधन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सुनील भगत/ दक्षिण नागपूर** : दूरदर्शन च्या प्रसिद्ध हिंदी बातमी उद्घोषिका सरला माहेश्वरी



यांचे दिल्ली येथे आज ७१ व्या वर्षी आज 12 फरवरी 2026 दु:खद निधन झाले आहे. त्यांचा जन्म २१ जुलै १९५४ बिकानेर राजस्थान येथे झाला होता. पती अरुण माहेश्वरी होते. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे.त्या बंगाल राज्यातील राज्य सभेच्या कम्युनिस्ट (मार्क्सिस्ट)पक्षाच्या खासदार राहिल्या १९९० -१९९५ आणि १९९९ ते २००५ त्यांचा कार्यकाळ होता. त्यांची अंत्ययात्रा ४ वाजता १२ फेब्रुवारी २०२६ रोजी संध्याकाळी होईल.

# सहकार महर्षी मा. खासदार उत्तमराव ढिकले यांचे जयंतीनिमित्त भव्य कॅरम स्पर्धा

## मोनाली धोत्रे, भूषण भटाटे, उत्कर्ष परदेशी, राम जयस्वाल, भूमिका वाघमारे, दिशाली बलदवा,अशोक कचरे संगीता मोरे यांना विजेतेपद

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : सहकार महर्षी मा. खासदार स्व. उत्तमराव ढिकले यांच्या जयंतीनिमित्त स्व. उत्तमराव ढिकले स्पोर्ट्स फौंडेशन यांच्या वतीने आणि नाशिक जिल्हा कॅरम असोसिएशनच्या सहकार्याने नाशिकमध्ये भव्य कॅरम स्पर्धेचे आयोजन मेरी परिसरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल, संभाजी महाराज चौक, तारवाला नगर, दिंडोरी रोड, नाशिक येथे करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये १४ वर्षे, १९ वर्षे आणि १९ वर्षेवरील खुला गट पुरुष आणि महिला आणि जेष्ठ नागरिक पुरुष आणि महिला या आठ गटांचा होता.

या स्पर्धेत मोनाली धोत्रे, भूषण भटाटे, उत्कर्ष परदेशी, राम जयस्वाल, भूमिका वाघमारे, दिशाली बलदवा अशोक कचरे, संगीता मोरे यांनी सुंदर खेळाचे प्रदर्शन करत विविध गटांमध्ये विजेतेपद मिळविले. १४ वर्षे मुलांमध्ये अंतिम सामन्यात राम जयस्वाल याने संकेत चौहान याचा २-० असा पराभव करत विजेतेपद मिळविले या गटात कार्तिक गोडबोलेने तिसरा तर आदेश वसावे याने चवथा क्रमांक मिळविला. १९ वर्षे गटामध्ये राज्यस्तरीय खेळाडू उत्कर्ष परदेशी याने सुंदर खेळ करत आपले सर्व सामने सहज जिंकले तर अंतिम सामन्यात रुद्र पाटील यचंहो सरळ दोन सेटमध्ये पराभव करून विजेतेपद मिळविले या गटात गणेश दवंगेने तिसरा आणि प्रणव रामजाली याने चवथा क्रमांक मिळविला. १४ वर्षे मुलींच्या गटात भूमिका वाघमारे हीने अंतीम सामन्यात सुरवातीपासूनच सुंदर खेळ करत मनाक्षी कुलकर्णीचा १३-०३, १७-०९ असा पराभव करून विजेतेपद मिळविले. या गटात तेजल खंडारेने तिसरा आणि ईश्वरी हीने चवथा क्रमांक मिळविला. वरिष्ठ महिलांच्या गटात राष्ट्रीय खेळाडू धोत्रे हीने अंतिम लढतीत राज्य स्तरीय खेळाडू वेदांती पवार हिला पराभूत करून विजेतेपद मिळविले . या गटात ज्योती निकम यांनी तिसरा क्रमांक मिळविला. वरिष्ठ पुरुषांच्या गटामध्ये राष्ट्रीय खेळाडू भूषण भटा टे याने आपल्या दर्जाला साजेसा खेळ करत एकतर्फी विजयी पताका झळकावली.



त्याने अंतिम लढतीत नकुल चावरे याच्यावर २५-०९, २५-०७ अशी मात करत विजेतेपद आपल्या नांवे केले. या गटात यश अहिरे याने तिसरा तर योगेश डुकरे याने तिसरा क्रमांक मिळविला . जेष्ठ पुरूषांच्या त=गटात अशोक कचरे यांनी विजेतेपद मिळविले तर उमेश सेनभक्तने उपविजेटपॅड मिळविले. अभिषेकी मोहिते याने तिसरा तर राजेंद्र प्रधान यांनी चवथा क्रमांक मिळविला.जेष्ठ महिला गटात संगीत मोरे यांनी विजेतेपद तर प्रणाली अहिरे यांनी उपविजेपद मिळविले या गटात अनिता मोरे यांनी तिसरातर नेहा पुराणिक यांनी चवथा क्रमांक मिळविला.

या स्पर्धेच्या पारितोषिक समारंभाचे प्रमुख अतिथी माजी मुख्य कार्यकारी अभियंता जी. डी. पोखरकर यांच्या हस्ते आणि अशोक दुधारे, आनंद खरे, अशोक कचरे,दीपक निकम यांच्या हस्ते सर्व गटातील पहिले चार क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंना आकर्षक मेडल्स आणि प्राविण्य प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलतांना मुख्य कार्यकारी अभियंता जी. डी. पोखरकर यांनी सांगितले की, खेळाडूंना स्पर्धेचे उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे काम सहकार महर्षी स्व. उत्तमराव ढिकले स्पोर्ट्स फौंडेशनच्या वतीने करून दिले जाते ही फार आहे. यामुळे खेळाडूंना आपल्या खेळामध्ये मिळते. मी देखील माझ्या परीने अश्या क्रीडा उपक्रमाना सर्व प्रकारचे सहकार्य करेन असे आश्वासन त्यांनी दिले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक निकम यांनी केले आणि दर महिन्याला अश्या सर्व गटांच्या स्पर्धांचे आयोजन करून खेळाडूंना घडवण्याचे आमचे प्रयत्न सुरु राहतील अशी आमचा प्रयत्न राहील असे त्यांनी सांगितले.

**अंतिम निकाल :**

१४ वर्षे मुले :

१) राम जयस्वाल - प्रथम २) संकेत चव्हाण - द्वितीय, ३) कार्तिक गोडबोले - तृतीय, आदेश वसावे - चतुर्थ..

१४ वर्षे मुली :-

१) भूमिका वाघमारे - प्रथम, मनाक्षी कुलकर्णी - द्वितीय, ३) तेजल खंडारे - तृतीय, - ईश्वरी पुराणिक -चतुर्थ.

१९ वर्षे मुले :-

१) उत्कर्ष परदेशी - प्रथम, रुद्र पाटील - द्वितीय, गणेश दवंगे - तृतीय, प्रणव रंमजाली - चतुर्थ.

१९ वर्षे मुली :-

१) दिशाली बलदवा- प्रथम, मेघा बिडे - द्वितीय, गौरी तेलंगड - तृतीय, कृतिका काकवीपुरे - चतुर्थ.

वरिष्ठ गट पुरुष :-

१) भूषण भटाटे - प्रथम, नकुल चावरे - द्वितीय, यश अहिरे - तृतीय, योगेश डुकरे - चतुर्थ.

*वरिष्ठ गट महिला :-*

१) मोनाली धोत्रे - प्रथम, वेदांती पवार - द्वितीय, ज्योती निकम - तृतीय.

*जेष्ठ नागरिक पुरुष :-*

१) अशोक कचरे - प्रथम, उमेश सेनभक्त - द्वितीय, अभिषेक मोहिते - तृतीय, राजेंद्र प्रधान - चतुर्थ.

*जेष्ठ नागरिक महिला :-*

१) संगीता मोरे - प्रथम, प्रणाली अहिरे - द्वितीय, अनिता मोरे - तृतीय, नेहा पुराणिक - चतुर्थ.

# सातपुड्याच्या कुशीत वसलेले धारगड शिवमंदिर १५ फेब्रुवारीला खुले !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोट तालुका प्रतिनिधी :** सातपुड्याच्या कुशीत वसलेले श्री क्षेत्र धारगड येथील पुरातन शिवमंदिर १५ फेब्रुवारी ला महाशिवरात्री निमित्त सकाळी ६ ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिवभक्तांसाठी दर्शनाकरिता खुले राहणार आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी वन विभागाने निर्धारित केलेल्या अटी-शर्ती व वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन श्री क्षेत्र धारगड सेवा समिती, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल अकोट प्रखंड यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**शिवभक्तांना धारगड टी-पॉइंटपर्यंत**

चारचाकी वाहन (कार) घेऊन जाण्याची परवानगी राहील. तेथून श्री क्षेत्र धारगड मंदिरापर्यंत सुमारे एक किलोमीटर अंतर निसर्गरम्य वातावरणातून पायदळ जावे लागणार आहे. दुचाकी वाहनांना खटकाली गेटपर्यंत परवानगी असेल. खटकाली गेटपासून भाविकांसाठी वन विभागाच्या वतीने वाहनसेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. धारगड टी-पॉइंट येथे श्री क्षेत्र धारगड सेवा समिती, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांच्या वतीने भाविकांसाठी फराळ व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

शिवभक्तांनी दर्शनासाठी येताना प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, ज्वलनशील पदार्थ, धारदार शस्त्रे आदी वस्तू आणू नयेत, तसेच सूचनांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे.

# आमणी (खु) येथील अवैध दारू बंद करा; संतप्त ग्रामस्थ पोलीस ठाण्यावर धडकले

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ)** : खेड्यापाड्यात अवैध दारूचा महापूर उसळल्याचा धक्कादायक प्रकार महागाव तालुक्यात दिसत आहे. आमणी (खुर्द) या लहानशा गावात तब्बल २० हातभट्ट्या सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, विषारी दारू प्राशनामुळे एका तरुणाचा मृत्यू झाल्याने गावात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर आज बुधवारी सायंकाळी सुमारे ८ वाजता ३०० हून अधिक संतप्त नागरिकांनी महागाव पोलीस ठाण्यावर धडक देत ठिय्या आंदोलन छेडले.

गावातील एका तरुणाचा लिव्हर निकामी झाल्याने मृत्यू झाला. कुटुंबीय आणि ग्रामस्थांचा आरोप आहे की, हा मृत्यू गावात खुलेआम विक्री होणाऱ्या विषारी दारूमुळे झाला. "आमच्या डोळ्यांसमोर तरुण पिढी उद्ध्वस्त होत आहे. कित्येक युवक व्यसनाधीन झाले असून कुटुंबे रस्त्यावर आली आहेत," अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. 'दारू विक्रेत्यांना अटक झाल्याशिवाय हलणार नाही' पोलीस ठाण्यावर जमलेल्या नागरिकांनी ठाम भूमिका घेतली की, "जोपर्यंत अवैध दारू विक्रेत्यांना पकडून ठाण्यात आणले



जात नाही, तोपर्यंत आम्ही येथून हलणार नाही."आमच्या गावातील दारू तात्काळ बंद करा," अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

**तणावपूर्ण वातावरण**

रात्री उशिरापर्यंत नागरिकांनी पोलीस ठाण्यात ठिय्या मांडल्याने तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी ग्रामस्थांशी चर्चा करून कारवाईचे आश्वासन दिल्याची माहिती मिळाली असली तरी प्रत्यक्षात ठोस पावले उचलली जातील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ग्रामीण भागात वाढत चाललेल्या अवैध दारूच्या जाळ्यामुळे सामाजिक व आरोग्यविषयक प्रश्न गंभीर बनत आहेत.

# शेतकऱ्यांनी गहू पिकाच्या जैव संतृप्त वाणांचा वापर करावा : नारायण निबे

## "गहू जैव संतृप्त वाण उत्पादन तंत्रज्ञान" या विषयावरील शेती दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** मानवाच्या योग्य वाढ आणि विकासासाठी पौष्टिक आहार अत्यंत महत्त्वाचा आहे. तो रोगांना प्रतिबंधित करण्यास मदत करतो, शिवाय शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी शरीराचे चयापचय राखतो. अन्न आपल्या दैनंदिन चयापचय गरजा पूर्ण करण्यासाठी ऊर्जा, प्रथिने, आवश्यक चरबी, जीवनसत्त्वे, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे प्रदान करते. त्यासाठी गहू जैव संतृप्त वाण आपल्या शेतामध्ये घेऊन त्यांचा वापर आपल्या आहारामध्ये करण्याचे आवाहन कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव ने च्या कृषि विद्या विभागाचे प्रमुख श्री. नारायण निबे यांनी केले. कोळगाव तालुका शेवगाव येथील श्री. विनायक झिरपे, कोरडे वस्ती येथे आयोजित शेती दिन कार्यक्रमात ते बोलत होते. हा कार्यक्रम श्री. सचिन बडधे , विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार), श्री. आर.व्ही. ढाकणे , सह्हायक कृषि अधिकारी आणि प्रगतशील शेतकरी श्री. चंद्रकांत झिरपे यांच्या उपस्थितीत पार पडला.

श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने मा. अध्यक्ष आ. डॉ. नरेंद्रजी घुले पाटील , उपाध्यक्ष मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील, तज्ञ संचालक डॉ. क्षितीज घुले पाटील आणि सर्व विश्वस्त मंडळ श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडे यांचे मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत , कृषि विज्ञान केंद्र दहिगाव ने यांचे मार्फत गहू जैव संतृप्त वाण समूह आद्यरेषा पिक प्रात्यक्षिकाचे आयोजन कोळगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर येथे रब्बी हंगाम २०२६ मध्ये करण्यात आलेले आहे. यामध्ये एच.आय. १६३३ या वाणाचे प्रात्यक्षिक सदर गावात २५ प्रगतशील महिला आणि पुरुष शेतकऱ्यांच्या शेतावर घेण्यात आले आहे. गहू पिकातील आधुनिक तंत्रज्ञान तसेच जैव संतृप्त वाण तळागळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे दृष्टीने हे प्रात्यक्षिक घेतले असून जास्तीत जास्त उत्पादन देणारे जैव संतृप्त सोबतच योग्य लागवड तंत्रज्ञान , माती परीक्षणानुसार योग्य अन्न द्रव्यांचा वापर, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन तसेच काढणी पश्च्यात तंत्रज्ञान या प्रात्यक्षिकातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा कृषि विज्ञान केंद्राचा प्रामाणिक प्रयत्न आहे. याचाच एक भाग म्हणून आज येथे "गहू जैव संतृप्त वाण उत्पादन तंत्रज्ञान" या विषयावर शेती दिनाचे आयोजन करण्यात आले. शेती दिनानिमित्त शेतकऱ्यांनी गहू पिकात वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती



प्रगतशील शेतकरी श्री. चंद्रकांत झिरपे, श्री. विनायक झिरपे आणि श्री. अर्जुन खंडागळे यांनी दिली. सदर प्रात्यक्षिकात जैव संतृप्त वाण, त्यांनी रासायनिक तसेच जिवाणू खताची बिजप्रक्रीया, सुक्ष्म अन्नद्रव्य चा वापर, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर केल्याचे त्यांनी सांगितले. कृषि विस्तार विभागाचे विषय विशेषज्ञ श्री. सचिन बडधे यांनी शेती दिनाचे महत्व उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले.

श्री. नारायण निबे , विषय विशेषज्ञ (कृषि) विद्या , कृषि विज्ञान केंद्र , दहिगाव ने यांनी भारतीय कृषी संशोधन परिषदेने (ICAR) प्रजनन पद्धती वापरून धान्ये, डाळी, तेलबिया, भाज्या आणि फळांच्या उच्च उत्पादन देणाऱ्या जातींमध्ये पौष्टिक गुणवत्ता सुधारली आहे. १२ व्या योजनेत बायोफोर्टिफिकेशनवरील कन्सोर्टियम रिसर्च प्लॅटफॉर्मवर एक विशेष प्रकल्प सुरू करून विशेष प्रयत्न सुरू करण्यात आले. इतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उपक्रमांच्या सहकार्याने एकत्रित प्रयत्नांमुळे तांदूळ, गहू, मका, बाजरी, मसूर , शेंगदाणे, जवस, मोहरी, सोयाबीन, फुलकोबी , बटाटा, रताळे, आणि डाळिंब या ८७ जाती विकसित केल्या तसेच देशाची पौष्टिक सुरक्षा साध्य करण्यासाठी या बायोफोर्टिफाइड जाती खूप महत्त्वाच्या आहेत. या जैव संतृप्त वाणांना जनतेमध्ये लोकप्रिय करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. जैव संतृप्त वाणांचे दर्जेदार बियाणे तयार केले जात आहेत आणि व्यावसायिक लागवडीसाठी उपलब्ध करून दिले जात आहेत. आयसीएआरच्या विस्तार विभागाने त्यांच्या कृषी विज्ञान केंद्रांद्वारे (केव्हीके) जैव संतृप्त वाणांचा विस्तार करण्यासाठी पोषण अभियान सुरु करून प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर जैव संतृप्त वाणांचे प्रात्यक्षिक घेण्यात येत आहेत. या विषयी माहिती दिली.

यावेळी प्रगतशील शेतकरी अशोक झिरपे, प्रदिप झिरपे, अशोक झिरपे, अक्षय झिरपे , अरुण खंडागळे तसेच कृषि विज्ञान केंद्राचे तांत्रिक सह्हाय्क श्री. धनंजय भुमकर आणि निलेश काळे तसेच इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सचिन बडधे तर श्री. चंद्रकांत झिरपे यांनी आभार मानले.

# सांस्कृतिक व क्रीडा विभागाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** देगलूर(दि.१२) कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय हणेगाव अंतर्गत सांस्कृतिक व क्रीडा विभागाच्या विविध कार्यक्रमांचे उद्घाटन दिनांक १२ फेब्रूवारी २०२६ रोजी करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.उमाकांत बिरादार हे होते,तर उद्घाटक म्हणून डॉ.उत्तम मानवते डॉ.अशोक साबणे डॉ.सूर्यकांत कळसकर आदींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पवन एमेकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ.शिलादेवी कांबळे यांनी केले.या पहिल्या दिवशी शंभर मीटर धावणे,गोळा फेक, भालाफेक,दोरी,अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.या सर्व कार्यक्रमासाठी



महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.या कार्यक्रमासाठी डॉ.बालाजी राठोड प्रा.भरत बिरादार,प्रा. वैभव जाधव,शंकर राठोड,मारोती चव्हाण,संतोष सुरेवाड,मोसिन मचकुरी,प्रवीण राठोड,रोहित कांबळे आदींचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्यवाहक डॉ.चरणसिंग राठोड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंचशील एकंबेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# मंदिर प्रीमियर लीग क्रिकेट कोल्हापूर करिता श्री रेणुका देवी मंदिर संस्थानाचा संघ रवाना

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सय्यद इसा /श्रीक्षेत्र माहूरगड :** दिनांक 14 ,15,16 फेब्रुवारी दरम्यान होऊ घातलेल्या टेनिस बॉल क्रिकेटचे मंदिर प्रीमियर लीग टेनिस बॉल क्रिकेटचे निमंत्रितांचे सामने कोल्हापूर शास्त्रीनगर मैदान येथे आयोजित केले आहे यामध्ये 12 देवस्थान संघाने सहभाग नोंदविला आहे त्यामध्ये 1) श्रीक्षेत्र ज्योतिबा 2) श्री क्षेत्रअंबाबाई 3)श्री क्षेत्र नरसिंह 4) श्री क्षेत्र घोड्यावरचा गणपती5) परशुराम सोशल फाउंडेशन 6) श्री क्षेत्र तुळजापूर 7) श्री क्षेत्र तुळजापूर नंबर 8 ) श्री क्षेत्र पंढरपूर नंबर 9 )श्री क्षेत्र रेणुकामाता माहूरगड 10) श्री क्षेत्र अंबाबाई 11) श्री क्षेत्र शिर्डी 12) श्रीक्षेत्र महालक्ष्मी (सारसबाग पुणे) या संघाने सहभाग नोंदविला आहे.



श्री रेणुका देवी क्रिकेट संघ खेळाडूंची नावे खालील प्रमाणे कर्णधार श्रावण जाधव , उप कर्णधार गजानन लाडे, अंकुश जाधव ,राजू परळकर ,राजू कराळे ,अरुण घोडेकर, आकाश जाधव, गजानन घुगे ,अवधूत अडकिने ,निखिल वानखेडे ,संजय खडसे, उकंडराव जाधव, इंद्रजीत राठोड, मनोहर राठोड ,दीपक जगदाळे या सर्व खेळाडूंना माहूर तहसीलचे कर्तव्यदक्ष तहसीलदार अभिजीत जगताप सर व रेणुका देवीचे सर्व विश्वस्त मंडळ, व्यवस्थापक साबळे सर, राऊत सर यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त रायगड जिल्हास्तरीय कबड्डी निवड चाचणी स्पर्धा

## १९८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ भाग घेणार; २० ते २२ फेब्रुवारीपर्यंत रंगणार कबड्डीचा दम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७५ वा वाढदिवस अर्थात अमृत महोत्सवी वर्ष अनेक समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरे होत आहे. त्या अनुषंगाने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने "रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गटाची जिल्हा अजिंक्य पदाची निवड चाचणी कबड्डी स्पर्धा" आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा शुक्रवार दि. २० ते रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल जवळील रामशेठ ठाकूर मैदानात संपन्न होणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे माजी सहकार्यवाह जे. जे. पाटील आणि आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक व जिल्हा पंच मंडळाचे अध्यख शरद कदम यांनी आज (दि. १२) उलवे नोड येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री व राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष राहिलेले अजितदादा पवार यांना पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या सभागृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेला माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, मंडळाचे सचिव व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष हिराचंद पाटील, सूर्यकांत ठाकूर, खजिनदार जगदीश पाटील, समीर माने, जनार्दन पाटील, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, ॲड. राहुल घरत, भार्गव ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कबड्डीचे अतूट नाते असून या मंडळाने स्पर्धेला बळ दिले आहे. त्या अनुषंगाने पनवेलमध्ये कबड्डीचे दर्जेदार आयोजन असते असे जे. जे.पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे त्याबद्दल आभार मानले. त्यांनी स्पर्धेविषयी प्रसारमाध्यमांना अधिक माहिती देताना सांगितले कि, रायगड जिल्ह्यातील प्रौढ महिला व पुरुष कबड्डी खेळाडूंकरिता



ही स्पर्धा जिल्हा अजिंक्य पदासाठी निवड चाचणी स्वरूपात घेतली जाणार असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धांसाठी संघ निवड करण्याच्या दृष्टीने या स्पर्धेला विशेष महत्त्व आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील १९८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ भाग घेणार आहेत. त्या अनुषंगाने २७७२ पुरुष आणि ४४८ महिला असे एकूण ३२२० खेळाडू सहभागी होणार आहेत. १९८ कबड्डी संघांमधून पुरुष संघातून संभाव्य २० खेळाडूंची तर ३२ महिला संघामधून संभाव्य २० महिला खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. आणि त्यातून निवड झालेला १४ पुरुष खेळाडूंचा संघ व १४ महिला खेळाडू संघ महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये रायगडचे प्रतिनिधित्व करणार आहे. या दोन्ही संघाचा मार्गदर्शक सराव शिबिरसुद्धा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे याच मैदानावर घेण्यात येणार आहे. तसेच दिनांक १३ फेब्रुवारीला रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या १०० पंचांचे एक दिवसीय मार्गदर्शक शिबीर पनवेलमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून उत्कृष्ट आणि चुरशीच्या सामन्यांची क्रीडारसिकांना मेजवानी मिळणार आहे. लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित या क्रीडा स्पर्धेमुळे जिल्ह्यातील कबड्डी खेळाला चालना मिळून नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध होणार असून या स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता अनेक मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार असून या स्पर्धेसाठी छत्रपती पुरस्कार विजेते, अर्जुनवीर, राज्य संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचीही माहिती यावेळी देण्यात आली.

**अजितदादा पवार आणि कबड्डी यांचे अतूट नाते होते. आपल्या मातीतल्या या खेळाला त्यांनी नेहमीच मनापासून प्रोत्साहन दिले. विशेषत: रायगड संघाबद्दल त्यांना विशेष आपुलकी होती. त्यांच्या आशीर्वादामुळे रायगड जिल्ह्याचा संघ महाराष्ट्राच्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत अव्वल स्थान पटकावेल, असा मला विश्वास आहे.**

**- लोकनेते रामशेठ ठाकूर**

स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी जनरल सेक्रेटरी ॲड. आस्वाद पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार स्पर्धेची तयारी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने या स्पर्धेसाठी चार सुसज्ज मैदाने उभारण्यात येत असून सर्व खेळाडू व प्रेक्षकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर पूरक सुविधांचीही तयारी सुरु आहे. स्पर्धेचे सुरळीत, पारदर्शक आणि शिस्तबद्ध आयोजन सुनिश्चित करण्यासाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे स्वयंसेवक तसेच सुमारे १०० नामवंत पंच कार्यरत असणार आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे स्पर्धा उच्च दर्जाची आणि यशस्वी होईल, असा विश्वास यावेळी आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी समाजकार्यातील अखंड परंपरा जपली असून, आजही ती त्याच जोमाने सुरू आहेत. यंदा त्यांच्या अमृत महोत्सवी (७५व्या) वर्षाचे औचित्य साधून कीर्तन महोत्सव, भजन स्पर्धा, रक्तदान शिबीर, शिधा वाटप, विविध क्रीडा स्पर्धा, नाट्य महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा, संगीत मॅरेथॉन अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पूर्ण वर्षभर विविध सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून या अमृत महोत्सवी वर्षाचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्याच अनुषंगाने 'रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गटाची जिल्हा अजिंक्य पद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा' होणार आहे.

---

# कोळी समाजाचा मला नितांत आदर ; महेंद्रशेठ घरत

## केडीएच स्पोर्टस वाघिवली वाडा संघ ठरला विजेता

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** समुद्राच्या तुफान लाटांशी झुंजणारा कोळी बांधव आपली संस्कृती जपणारा समाज आहे. त्यामुळे कोळी समाजाचा मला नितांत आदर आहे. भूमिहीन शेतमजूर आहेत त्यांना सिडकोचे साडेबारा टक्के भूखंड मिळाले पाहिजेत, ही दिबांची भूमिका होती, पण त्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने आजही झालेली नाही, हे दुर्दैव आहे. मैदाने नसतील तर येणारी पिढी खेळणार कुठे, त्यामुळे मैदानांसाठी सर्वांनीच पुढे या, आपण भूमिपुत्र आहोत, आपला पहिला हक्क आहे. लढल्याशिवाय काहीच मिळत नाही. त्यामुळे मी आपल्यासोबत आहे. गावातील तरुणांनी पुढे यावे, घरे बांधावीत, गरजेनुसार घरांची गरज आपल्यालाही आहे. सत्ताधाऱ्यांना मूलभूत सुविधांचा विसर पडलेला आहे, असे महेंद्रशेठ घरत उरण येथील कुंडेगाव




येथे म्हणाले.

श्री गणेश हनुमान क्रिकेट क्लब कुंडेगाव कोळीवाडा यांनी कॉंग्रेस चषक आयोजित केला होता. त्यावेळी महेंद्रशेठ बोलत होते.त्यावेळी ते क्रिकेटपटूंशी संवाद साधताना म्हणाले, "परप्रांतीय येतील, झोपड्या बांधतील, सरकार त्यांना फुकटात घरे देईल, असेच सध्या सुरू आहे. त्यामुळे भूमिपुत्रांनो, सावध व्हा आणि वाढत्या गरजेनुसार घरे बांधा. कुंडेगावातील तरुणांनी पहिल्यांदाच प्रकाशझोतातील क्रिकेट सामने ठेवले, उत्तम आयोजन केले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन."

पालघर-वाडा येथे राज्यस्तरीय ब्रास बँड स्पर्धेत कुंडेगाव येथील जय हनुमान कला सर्कल ब्रास बँड पथकाला द्वितीय क्रमांक मिळाला. त्याबद्दल महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले. कॉंग्रेस कमिटीच्या वतीने महेंद्रशेठ घरत यांचे ब्रास बॅंडने स्वागत केले आणि यथोचित सन्मान केला.यावेळी केडीएच स्पोर्टस वाघिवली वाडा संघ विजेता ठरला; तर सुरुंग पाडा, फुंडे, पागोटे या संघानीही द्वितीय, तृतीय क्रमांकाची पारितोषिके मिळविली. यावेळी कॉंग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, सरपंच सविता मढवी, भजन गायक लक्ष्मण पाटील, ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष अजय पाटील, अंगद ठाकूर, भालचंद्र चोगले, चंद्रकांत ठाकूर, राजेश ठाकूर, कल्पेश पाटील, सतीश पाटील आदी उपस्थित होते.

---

# अलिबाग जिल्हा न्यायालयातील लोकअभिरक्षक सेवेचा जनसामान्यांना आधार!

## आर्थिक परिस्थिती नसणाऱ्या अशीलांना मोफत कायदेशीर मदत, विधी सेवा प्राधिकरणाचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** तुरूंगातील कैदी, महिला, मुले, अनुसूचित जाती-जमातीचे नागरिक, 60 वर्ष पूर्ण झालेले ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, आपत्तीग्रस्त व ज्या व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न 3 लाख व त्यापेक्षा कमी आहे अशा व्यक्तींना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून लाभ दिला जातो. आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे न्यायालयीन सुनावणीकरीता वकिलांचे शुल्क भरू न शकणाऱ्या अशीलांसाठी 3 वर्षापूर्वी लोकअभिरक्षक कार्यालय, अलिबाग जिल्हा न्यायालयात सुरू करण्यात आले असून मार्च महिन्यामध्ये त्याला 3 वर्ष पूर्ण होत आहेत.

याकालावधीत या कार्यालयाने अनेक



न्यायालयीन बंदी, आर्थिक परिस्थिती नसलेल्या आरोपींना मोफत खटले चालवण्याकरीता वकिल देवून कायदेशीर मदत केलेली आहे.

लिगल एड क्लिनिक- तुरूंगामध्ये लिगल एड क्लिनिक द्वारे कैद्यांना कायदेशीर पर्यायांची माहिती दिली जाते. दर आठवडयात 2 वेळा तुरूंगात भेट देवून हे काम केले जाते. कामाची विभागाणी- मुख्य व उपमुख्य लोकअभिरक्षक हे सत्र न्यायालयातील प्रकरणे हाताळतात. तर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयातील कामकाज सहाय्यक अभिरक्षक हे पाहतात. कोणती प्रकरणे हाताळली जातात- न्यायाधीशांनी सूचविलेली प्रकरणे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने पाठविलेली प्रकरणे, तुरूंगातील बंदी आरोपी यांच्याकडून आलेले अर्ज, अलिबागमध्ये असे आहे कार्यबळ- मुख्य लोकअभिरक्षक- 1, उपमुख्य लोकअभिरक्षक- 1, सहाय्यक लोकअभिरक्षक- 4, या योजनेला अत्यंत चांगला प्रतिसाद मिळत असून कायदेशीर सहाय्य मागण्यासाठी येणाऱ्या अर्जात सातत्याने वाढ होत असल्याचे लोकअभिरक्षक कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

---

# न.प. तुमसर च्या तीनही स्वीकृत सदस्यांचे सदस्यत्व रद्द

## राजकीय वर्तुळात खळबळ; नगराध्यक्ष सागर गभने यांना मोठा धक्का

**दैनिक युवक आधार**

**तुमसर तालुका प्रतिनिधी/ अमृतलाल चरडे :** तुमसर नगरपालिकेच्या तीन स्वीकृत सदस्यांचे महिनाभरापासून सदस्यत्व रद्द होण्याची टांगती तलवार असतानी आज अखेर या तीनही स्वीकृत सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. तर नगराध्यक्ष गभने यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे.

तुमसर नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सागर गभणे यांनी १६ जानेवारी २०२६ रोजी केलेल्या ३ स्वीकृत सदस्यांची निवड नगराध्यक्ष सागर गभने यांनी केली होती. या निवडीवरून चांगलाच वादंग माजला होता. अखेर तिघांचीही नियुक्ती बेकायदेशीर ठरवण्यात आली आहे. नियुक्ती करताना सरकारी नियमावली आणि आदेशांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. राज्य सचिवांनी या नियुक्ती रद्द करून स्वीकृत सदस्यांची निवड प्रक्रिया पुन्हा राबवण्याचे आदेश दिले आहेत. शिवाय भविष्यात पदाचा गैरवापर झाल्यास नगराध्यक्षांवर कडक कारवाई




करण्याचे संकेतही प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

नुकत्याच झालेल्या तुमसर नगर परिषद निवडणूक २०२५ मध्ये सागर गभणे यांनी अपक्ष म्हणून विजय मिळवला होता, ज्यानंतर ही पहिलीच मोठी राजकीय घडामोड मानली जात आहे.

राज्य सरकारचे उपसचिव प्रियांका कुलकर्णी (छपवाले) यांनी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, तुमसर नगर पालिकेतील ३ स्वीकृत सदस्यांची निवड प्रक्रिया कायदा आणि नियमांच्या तरतुदींनुसार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ही निवड रद्द करून नियमानुसार नवीन प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्वीकृत सदस्यांच्या निवडीत अधिकारांचा गैरवापर झाल्याचा ठपका ठेवत, या प्रकरणात संबंधित नगराध्यक्षांवर देखील शिस्तभंग किंवा पदाच्या गैरवापरासाठी कारवाई होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

**काय आहे प्रकरण**

१६ जानेवारी २०२६ रोजी तुमसर नगरपालिकेत स्वीकृत सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली होती. नियमानुसार ही नियुक्ती केवळ नगराध्यक्षांच्या इच्छेवर नव्हे, तर पक्षांच्या संख्याबळावर आधारित असावी लागते, मात्र नगराध्यक्ष सागर गभणे यांनी इतर सदस्यांना विश्वासात न घेता त्यांच्या मर्जीतील तीन सदस्यांची निवड केली. त्यामुळे या निवडीवर आक्षेप घेत नियमांचे उल्लंघन झाल्याची तक्रार विरोधकांनी केली होती. या तक्रारीची दखल घेत १९ जानेवारी रोजी जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशी दरम्यान ही निवड प्रक्रिया राबवताना शासकीय आदेशांकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून आले. जिल्हाधिकाऱ्यांनी या चौकशीचा अहवाल तयार करून ही प्रक्रिया थांबवण्याची आणि सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याची शिफारस राज्य सचिवांकडे केली होती. गेल्या महिन्याभरापासून शहरात हा मुद्दा राजकीयदृष्ट्या गाजत आहे.

**नगरविकास मंत्रालयाचा आदेश**

जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालावर आधारित, नगरविकास मंत्रालयाच्या उपसचिवांनी संबंधित ३ स्वीकृत सदस्यांच्या नियुक्ती तात्काळ रद्द केली आहे. या रिक्त जागांसाठी पारदर्शक पद्धतीने आणि सरकारी नियमांचे पालन करून पुन्हा नव्याने निवड प्रक्रिया राबवण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत."

---

# परळी वैजनाथ येथील 'अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्सपो २०२६ अधिकृत लोगोचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अनावरण

**दैनिक युवक आधार**

**गजानन पवार पाटील :** महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आगामी १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परळी वैजनाथ (जि. बीड) येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्सपो २०२६ या प्रदर्शनाच्या अधिकृत लोगोचे अनावरण आज जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व अर्पित चौहान यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. तुषार बावणे, पशुसंवर्धनसहाय्यक आयुक्त डॉ. विलास पावडे, डॉ. राजेश निचळ तसेच इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

लोगो अनावरणानंतर संवाद साधताना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले की, पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे प्रदर्शन देशातील जातिवंत पशुधन व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम ठरणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान एकाच ठिकाणी पाहण्याची संधी मिळणार आहे.जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, तरुण उद्योजक व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट देऊन आपले ज्ञान व उत्पन्न वाढवावे, असे



आवाहन त्यांनी यावेळी केले.

महा पशुधन एक्सपो २०२६ : प्रमुख आकर्षणे

याबाबत अधिक माहिती देताना जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांनी सांगितले की, या प्रदर्शनामध्ये –राज्यातील तसेच राज्याबाहेरील जातिवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या व पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे दर्शन,आधुनिक डेअरी फार्मिंग, चारा व्यवस्थापन व प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स,पशुधन आरोग्य, लसीकरण व वैज्ञानिक संगोपन याविषयावर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्यानेआयोजित करण्यात येणार आहेत.

संपूर्ण जिल्ह्यात प्रदर्शनाची व्यापक प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येणार असून, सोशल मीडियाच्या माध्यमातूनही नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे नियोजन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी व शेतकरी बांधवांनी या महोत्सवात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.